विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | सद्धर्म : त्रैमासिक |
| संस्थापक | : | गुंडोपंत, हरिभक्त |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | अनंत विनायक धोरे |
| प्रकाशन वर्ष | : | २०१७ |
| वर्ष | : | बावनवे |
| अंक | : | दुसरा |
| पृष्ठे | : | ३२ पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या**

**“ग्रंथालय” प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१७**

**गणपत्रिका क्रमांक : १९२**

Registered with the Registrar of News-paper for India, under R.N. 20770/71

सद्धर्म प्रकाशन

संस्थापक
गुंडोपंत हरिभक्त

वार्षिक ऐच्छिक देणगी
किमान ७५ रुपये

दीर्घकालीन (१५ वर्ष) सभासद देणगी १००० रु.
भारताबाहेरील सभासद देणगी १२५ $

# सद्धर्म
## त्रै मा सि क

।। त्रैलोक्यं मंगलं कुरु ।। नामूलं लिख्यते किंचित् ।।

वर्ष : बावन्नावे अंक : पहिला आषाढ/ श्रावण शके १९३९, जुलै २०१७

## *संपादकीय*

### होय होय वारकरी। पाहे पाहे रे पंढरी।।

**माझ्या जीवीची आवडी। पंढरपुरा नेईन गुढी।**
**पांडुरंगी मन रंगले। गोविंदाचे गुणी वेधले।।**

कैवल्यसाम्राज्यचक्रवर्ती संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांनी वरील शब्दात पंढरपूरच्या वारीचे महत्त्व विशद केले आहे. आषाढी व कार्तिकी अशा दोन वाऱ्या महाराष्ट्रात प्रसिद्ध आहेत. पेरणीची कामे आटोपून बळीराजा पंढरीच्या आसेने वारीला निघतो व मोठ्या श्रद्धेने मुखी 'ज्ञानोबा-तुकाराम' अशा जयघोषात पंढरपूरला पोचतो. लाखो भाविक अगदी शिस्तबद्ध पद्धतीने आपापल्या गावावरुन दिंडी घेऊन वारीला निघतात. दूरचित्रवाहिन्या देखील या पालखी व दिंडीचे वार्तांकन करताना दिसतात. मात्र वारीच्या मागची आध्यात्मिक पार्श्वभूमी समजून घेताना कोणी दिसत नाही. हातात टाळ व वीणा घेऊन हजारो मैलाचे अंतर वारकरी कापतात ते विठ्ठलाच्या दर्शनाच्या ओढीने. यामागील तात्विक भाव समजून घेणे प्रसंगोपात्त ठरते.

'वारी' या शब्दाच्या अनेक व्युत्पत्ती सांगता येतील. संस्कृत भाषेत 'वारि' म्हणजे पाणी. पाण्याचा प्रवाह जसा अनेक वळणं घऊन समुद्राला मिळतो तसा वारकऱ्यांच्या भक्तिप्रेमाने भारलेला प्रवाह पंढरपुरी मिळतो. अमरकोषात 'वार' हा शब्द 'समुदाय' या अर्थाने वापरला आहे. यावरून भक्तांचा समुदाय असा 'वारी' शब्दाचा अर्थ काढता येतो. ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीत 'वारी' हा शब्द 'फेरा' किंवा 'खेप' या अर्थाने वापरला आहे. ही वारी कधी सुरु झाली याबद्दल विद्वानांमध्ये मतभेद आहेत. मात्र

(पृष्ठ क्र. २९ वर)

## सद्धर्म त्रैमासिकासंबंधी माहिती व सूचना

१) 'सद्धर्म' त्रैमासिकाचे वर्ष एप्रिल ते मार्च आहे. सौ. मालतीबाई नवाथे ट्रस्टच्या सद्धर्म प्रकाशनातर्फे हे त्रैमासिक एप्रिल, जुलै, ऑक्टोबर व जानेवारी या महिन्यात प्रसिद्ध केले जाते. या अंकाचे वर्षात केव्हाही सभासद होता येते. सभासद झाल्यावर त्या वर्षाचे ४ अंक पाठविले जातील.

२) ट्रस्टच्या कार्यालयाचा पत्ता : सौ. मालतीबाई नवाथे ट्रस्ट, द्वारा लक्ष्मी-केशव कार्यालय, प्रताप सिनेमासमोर, कोलबाड, ठाणे-४००६०१.दूरध्वनी : २५४७२७७१ कार्यालयाची वेळ : सकाळी १० ते सायं. ७.

३) सभासद देणगी : वार्षिक ७५ रु., दीर्घकालीन १००० रु.(१५ वर्षाकरता)

परदेशस्थ सभासदांना १२५ $ दीर्घकालीन योजना (१५ वर्षाकरता) .५०० रुपये आजीव सभासद योजना २००९ पासून बंद करण्यात आली असून नवीन दीर्घकालीन सभासद योजना सुरु करण्यात आली आहे. ३१ मार्च २००९ पर्यंत झालेल्या सर्व आजीव सभासदांना हा अंक त्यांच्या हयातीपर्यंत पाठविला जाईल. बऱ्याच आजीव सभासदानी वाढत चाललेल्या महागाईचा विचार करुन आम्ही केलेल्या विनंतीनुसार ऐच्छिक देणगी म्हणून ५०० रुपये ते १००० रुपये पाठविले आहेत. ज्यांनी आजपर्यंत ऐच्छिक देणगी पाठविली नाही त्यांनी ती लवकर पाठवावी अशी कळकळीची विनंती आहे.

४) देणगी, धनादेश (चेक) किंवा धनरोखाने (डिमाण्ड ड्राफ्ट) ट्रस्टच्या कार्यालयाच्या पत्त्यावर पाठवावी. देणगी पाठविताना आपले संपूर्ण नाव (संस्था अस त्यास अध्यक्ष किंवा कार्यवाह) पूर्ण पत्ता (पिन कोडसह) सभासद क्रमांक (सभासद असल्यास) व दूरध्वनी क्रमांक (कोड नंबरसह) ही माहिती सुवाच्य अक्षरांत कळवावी.

**५) दि. १ एप्रिल २०१५ पासून मनीऑर्डरने पैसे पाठविता येणार नाहीत.**

**देणगी ट्रस्टच्या खालील बँकांतील सेव्हिंग्ज खात्यांतही भरता येईल.**

| बँक | शाखा | खाते क्र. | बँक IFSC कोड |
|---|---|---|---|
| **स्टेट बँक ऑफ इंडिया** SBI | **जे के ग्राम, ठाणे (प.)** | **10884930955** | **SBIN 0009056** |
| **ठाणे जनता सहकारी बँक** TJSB | **खोपट, ठाणे (प.)** | **009110100016689** | **TJSB 0000009** |
| **ठाणे भारत सहकारी बँक लि.** TBSB | **मुख्य शाखा,ठाणे (प.)** | **002115000024520** | **TBSB 0000002** |

वरील सर्व बँक खात्यांचे दिलेले तपशील वापरुन आपणास सद्धर्म त्रैमासिकाची देणगी पाठविण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे. आता देणगी पाठविण्यासाठी भ्रमणध्वनी (Mobile Application) चा वापर करूनही ती पाठवू शकता. त्याचा निश्चित वापर करावा. त्याचा उपयोग करून आपण देणगी पाठवितांना या (Mobile Application) च्या Narration रकान्यात प्रथम देणगीदार क्रमांक, आपले पूर्ण नाव व भ्रमणध्वनी क्रमांक क्रमाने लिहिणे आवश्यक आहे. अन्यथा आपले नावावर देणगी जमा करणे कठीण पडते. हे लक्षात घ्यावे, व सहकार्य करावे. ही विनंती.

भारतीय स्टेट बँक त्यांच्या इतर शाखांतून आलेली रोख रक्कम (चेक नव्हे) ग्राहकांच्या खात्यांत जमा करण्याकरता २५ रुपये सेवा शुल्क आकारते. तेव्हा त्या बँकेत देणगी रोख रकमेत पाठविताना २५ रुपये अधिक पाठवावे.

वरील बँकांमार्फत देणगी पाठविल्यास पोस्टकार्डने किंवा दूरध्वनी वरुन ट्रस्टच्या कार्यालयात किंवा श्री. प्रकाश भास्कर दीक्षित (कार्यकारी विश्वस्त) यांना कळवावे. यामुळे देणगीची नोंद घेणे सोयीचे होईल. (पत्ता पुढे दिला आहे.)

५) सद्धर्म त्रैमासिकासंबंधी अधिक माहिती हवी असल्यास खालील ठिकाणी संपर्क साधावा.

श्री. प्रकाश भा. दीक्षित, ३०२, दुर्गा सोसायटी, कोलबाड, ठाणे ४०० ६०१. दू.क्र. : २५४७२००५,
भ.क्र.: ९८१९६९३१९५ अंकाच्या पाकिटाच्या पत्त्याच्या लेबलवर खालील माहिती छापली आहे.

सभासद क्रमांक वा. दे.(वार्षिक देणगीदार सभासद), दी. का.(दीर्घकालीन सभासद),आ.(आजीव सभासद), का.भे. (कायम भेट)'वा. दे.' व 'दी. का.' याच्या पुढे देणगी संपण्याचा महिना व वर्ष नोंदविलेला असतो.

**- संपादक**

## *अनुक्रमणिका*


| | |
|---|---|
| संपादकीय | १ |
| देणगीसंबंधी निवेदन | २ |
| संस्कृत सुभाषितांचे अंश व समानार्थी म्हणी, वाक्प्रचार | ४ |
| ज्योतिर्लिङ्गस्तोत्रम् । वाराणस्यां तु विश्वेशम्। | ६ |
| गीतकृष्णायन-भाग ४- योगेश्वर | ७ |
| श्री साईबाबांचा अमृतप्रसाद ''उदी'' | १० |
| आध्यात्म विचारांची आजची गरज! | १६ |
| ज्ञानोबांच्या शब्दांत सकल-विद्या-कला-निधि गणपतीची ओळख | १९ |
| कौटिल्यीय अर्थशास्त्र | २६ |


आपणांस कांही लेख पाठवायाचे असल्यास तेही पाठवावेत. संपादकांच्या अनुमतीने योग्य असल्यास, आवश्यकता वाटल्यास योग्य ते संपादकीय संस्कार करून छापले जातील. सर्व देणगीदारांस नम्र विनंती - बँकेत परस्पर जमा रकमेचा ते पैसे कोणी भरले आहेत याचा तपशील दिला जात नसल्याने देणगीदाराच्या नांवावर पैसे जमा करता येत नाहीत, पण न्यासाच्या हिशोबात योग्य प्रकारे नोंद घेतली जाते.

गेली अनेक दशके गिरगांवातील '**श्रीधर भालचंद्र आणि कंपनी**' कापडाचे व्यापारी श्री. सुहास व अनिल लघाटे हे सद्धर्मसाठी देणगी स्वीकारण्याचे काम अविरतपणे चोख करत असत. पण काही व्यक्तीगत कारणामुळे १ एप्रिल, २०१७ पासून तेथे देणगी स्वीकारता येणार नाही असे त्यांनी कळविले आहे. तरी आता त्यांच्याकडे देणगी स्वीकारली जाणार नाही याची सर्व देणगीदारांनी कृपया नोंद घ्यावी. त्यांनी इतके दिवस व्यक्तिशः केलेल्या सहकार्याबद्दल आम्ही सर्व विश्वस्त त्यांचे ऋणी व आभारी आहोत. **- संपादक**

### सद्धर्माची प्रकाशने

(पोस्टेज सह)

| | | |
|---|---|---|
| १) | सुलभ संध्या व पूजा | रु. ५ |
| २) | श्री गणेश चतुर्थी पूजाविधि | रु. ५ |
| ३) | हरितालिका पूजा विधि | रु. १० |
| ४) | श्री सत्यनारायण पूजा व कथा | रु. १५ |
| ५) | कोजागिरी पूजाविधि (मराठी कथेसह) | रु. १० |
| ६) | तुलसी विवाहविधि | रु. १० |
| ७) | पातंजल योग सूत्राणि (मराठी अर्थासह) | रु.२५ |
| ८) | कै. ह.ज. दामले स्मृती विशेषांक (या अंकात मौलिक विचारांचे लेख व उद्बोधक, उपयुक्त माहिती आहे. अवश्य संग्रही असावा, असा हा अंक आहे.) | रु.१५ |
| ९) | सौंदर्यलहरी स्तोत्र (मराठी समश्लोकीसह) | रु.३० |
| १०) | उपासना | रु. ४० |
| ११) | श्रीरामरक्षेतील व्याकरण | रु. ५० |
| १२) | चांगदेव पासष्टी | रु. ४० |
| १३) | गंगालहरी | रु. २५ |
| १४) | गणपत्यथर्व शीर्षांतील व्याकरण | रु. ३० |
| १५) | सांख्यदर्शन | रु. ३० |
| १६) | श्री लक्ष्मी पूजा विधीः (हस्तलिखीत) | रु. १५ |

### एप्रिल ते जून २०१७

दीर्घकालीन सभासद (दी. का.) आणि ऐच्छिक / विशेष देणगी देणाऱ्यांची नावे वरील माहिती काही अपरिहार्य कारणामुळे पुढील अंकात देण्यात येईल.

**- संपादक**

## संस्कृत सुभाषितांचे अंश व समानार्थी म्हणी, वाक्प्रचार

दि. दा. औटी

लेख ३१ वा

**अरक्षितं (किन्तु) दैवरक्षितं तिष्ठति।**[३६९]
**देव तारी त्याला कोण मारी?**

संपूर्ण सुभाषित :

**अरक्षितं तिष्ठति दैवरक्षितं**
**सुरक्षितं दैवहतं विनश्यति।**
**जीवत्यनाथोऽपि वने विसर्जितः**
**कृतप्रयत्नोऽपि गृहे न जीवति।।**

दैवाची जर भक्कम साथ असेल तर कोणाचेही सहाय्य न मिळता मनुष्य तरुन जातो आणि दैवाची साथ नसेल तर कितीही उपाय केले तरी सुरक्षित ठिकाणी पण त्याचा नाश होतो. अनाथाला वनात टाकून दिले तरी दैवाच्या साथीमुळे तो वाचतो व घरात असलेला दैवकृपा नसल्याने जगत नाही.

नुकतेच वर्तमानपत्रात आलेले सात वर्षाच्या मुलीचे उदाहरण बोलके आहे. ही मुलगी जंगलातील माकडांच्या सहवासात असलेली सापडली. ही माकडांसारखी चार पायावर चालत होती व त्यांच्या सारखेच ओरडत होती. तिला पकडून आणण्यात आले व आता तिच्यावर उपचार चालू आहेत.

**अजीर्णे भेषजं वारि**[३७०]

अपचन झालेले असतांना पाणी (पिणे) हे उत्तम औषध आहे.

संपूर्ण सुभाषित :

**अजीर्णे भेषजं वारि**
**जीर्णे वारि बलप्रदम्।**
**अमृतं भोजनार्धे तु**
**भुक्तस्योपरि तद्विषम्।।**

अपचनावर पाणी (भरपूर) प्यावे असा उपाय सांगितला आहे. अन्न पचविणारे आणि बळ वाढविणारे पाणी आहे. जेवणाच्या मध्ये तर ते अमृतासारखे आहे पण जेवण झाल्यावर पिणे विषकारक आहे.

**अव्यवस्थितचित्तस्य प्रसादोऽपि भयङ्करः।।**[३७१]

भरकटलेल्या माणसाने केलेली कृपा सुद्धा त्रासदायक असते.

पहिली ओळ :

**क्वचिदृष्टः क्वचित्तुष्टः रुष्टः तुष्टः क्षणे क्षणे।**

असा माणूस कधी भडकलेला तर कधी खुश असलेला, कधी रागावलेला तर कधी आनंदी.

ह्याच श्लोकात प्रासादोऽपि असा पण पाठ आहे. त्याचा अर्थ असा माणूस राजवाड्यात राहिला तरी त्याच्या चित्तवृत्तीत फरक पडत नाही.

**अङ्कमारुह्यसुप्तं हि हत्वा किं नाम पौरुषम्?।।**[३७२]

मांडीवर झोपलेल्याच्या पाठीत सुरा खुपसण्यात कोणता पुरुषार्थ दिसून येतो.

पहिली ओळ :

**विश्वासप्रतिपन्नानां वञ्चने का विदग्धता?।**

ज्याने आपल्यावर विश्वास ठेवला आहे अशा माणसाची फसवणूक करणे म्हणजे झोपलेल्याच्या पाठीत सुरा खुपसणे.

**यस्य किञ्चित् न दातव्यं तस्य देयं किमुत्तरम्?।**[३७३]

ज्याला काही प्रत्यक्ष द्यायचेच नाही (हे ठरलेले आहे) त्याला काय उत्तर द्यावे?

दुसरी ओळ :

**अद्य सायं, पुनः प्रातः, सायं प्रातः पुनः पुनः।।**

एखादा मनुष्य काही तरी कारणास्तव पैसे मागायला आला आणि देणाऱ्याची इच्छा नाही पण सांगायला जड जाते मग अशाने काय उत्तर द्यावे? आज संध्याकाळी या. संध्याकाळी आला की–नाही उद्या सकाळीच या. परत परत आला की असेच सकाळ संध्याकाळ उत्तर देत राहायचे म्हणजे येणारा कंटाळून येणे सोडून देतो.

**अमित्रस्य कुतः सुखम्?।।**[३७४]

ज्याला मित्र नाही त्याला सुख कोठले?

संपूर्ण श्लोक :

**अलसस्य कुतो विद्या,**
**अविद्यस्य कुतो धनम्?**
**अधनस्य कुतो मित्रम्?**
**अमित्रस्य कुतो सुखम्?।।**

**वृद्ध कुमारी वाक्यवर न्याय।**[३७५]

म्हाताऱ्या कुमारीचे मागणे.

एका कार्यात अनेक इष्ट कार्य साधणे. म्हाताऱ्या पण कुमारी बाईने देव प्रसन्न झाल्यावर देव म्हणाले 'वरं ब्रूहि' वर माग. ती म्हणाली, ''माझी नातवंडे सोन्याच्या भांड्यात दुधभात खावोत'' ह्यात पती, पुत्र, नातू आणि श्रीमंती सर्वच मागितल्यासारखे झाले.

इति शिवम्। क्रमशः

**दि. दा. औटी**
शिवकृपा, घर नं. ७३,
मु. पो. मुद्रे खुर्द, ता. कर्जत,
जि. रायगड - ४१० २०१
दूरध्वनी : ०२१४८-२२११०९
मोबाइल : ९४२००५९५७४

●●●

## सुखाची तळमळ

**मानस मानसापरी अगाध।**
**शांत विशुद्ध विशाल।**
**तयीं बुद्धिजविकारकल्लोळ। उठों नेदीं।।**

मन मानससरोवरासारखे अगाध असावे. ('अगाधम् अतलस्पर्शे' ज्याचा तळाचा थांगपत्ता लागत नाही इतके विशाल आणि खोल असते ते अगाध) ते शांत विशुद्ध व विशाल असावे. त्याच्यावर बुद्धि-बुद्धिवादमूलक विकारांचे कल्लोळ निर्माण होतील असे करू नका. बुद्धिनिष्ठ अहंकाराचे वारे मनाला प्रक्षुब्ध करतात. ती प्रक्षुब्धता मनाचा 'मनपणा' नष्ट करते, आणि मानवाला दुःखी, असंतुष्ट बनविते. सुखाची तळमळ असेल तर मन शांत ठेवा. निर्विकार ठेवा. तोच सुखाचा ठेवा आहे.

(सद्धर्म त्रैमासिक एप्रिल १९९७ च्या अंकातून)

लेख ९ वा

**सानन्दमानन्दवने वसन्त –**
**मानन्दकन्दं हतपापवृन्दम्।**
**वाराणसीनाथमनाथनाथं**
**श्रीविश्वनाथं शरणं प्रपद्ये।।**

अन्वयः – सानन्दं, आनन्दकन्दं, हतपापवृन्दं, वाराणसी-नाथम्, अनाथनाथम्, आनन्द वने वसन्तं श्रीविश्वनाथम् अहं शरणं प्रपद्ये।

भाषांतर :- जो आनन्दमयी आहे, आनन्दाचा कन्द म्हणजे मोठा ठेवा आहे, जो पापांच्या समूहाचा नाश करतो, जो काशीचा मालक आहे, (काशीनाथ) जो अनाथांचा नाथ आहे आणि जो आनन्दवनात (काशीमध्ये) राहणारा आहे अशा त्या विश्वनाथाला मी शरण आलो आहे.

वृत्त – इन्द्रवज्रा-चार पाद. प्रत्येक पादात ११ अक्षरे त त ज ग ग हे गण. सर्व पाद सारखे म्हणून समवृत्त.

अलङ्कार – अनुप्रास न द व थ वर्णांची आवृत्ती. वारुणी आणि असि ह्या दोन नद्या गंगेला येथे मिळतात म्हणून नगरीचे नाव वाराणसी पडले. ह्या तीर्थ स्थानी काश नावाचे लोक राहत होते म्हणून नगरीला काशी असेही नाव पडले. हे शंकराचे आनन्दवन आहे. वेदकाळापासून प्रसिद्ध असलेल्या या काशीक्षेत्राचे वैभव आणि वाराणशीचे महत्त्व मुसलमानी राज्यकर्त्यांना सहन झाले नाही. इ.स. १०३३ पासून १६६९ पर्यंत त्यांनी या तीर्थक्षेत्राचा अनेक वेळा विध्वंस केला. मंदिरे पाडून मशिदी उभारल्या. इंग्रजी आणि मराठी सत्ताकाळात या क्षेत्राचे वैभव पुन्हा वाढले. सध्याचे काशीविश्वेश्वराचे मंदिर इ.स. १७७७ मध्ये अहिल्यादेवी होळकर यांनी बांधले आहे. महाराजा रणजित सिंग यांनी काशीविश्वनाथ मंदिराच्या शिखरांना सुवर्णाने मढवून काढले. या मंदिरातील प्रचंड घंटा नेपाळ नरेशांनी दिलेली आहे. काशीक्षेत्रात जसे लाखो हिंदू आपल्या अनेक धर्म कृत्यासाठी येऊन कृतकृत्य होतात तसेच अनेक देश-विदेशाचे अनेक धर्मी लोक नित्य येऊन येथील प्रेक्षणीय घाट, मंदिरे, तपोवने, सृष्टिसौंदर्य पाहून हर्षभरित होतात. येथील गंगोदक म्हणजे भूलोकीचे अमृतच आहे. काशीक्षेत्री मृत्यू म्हणजे मुक्तीच मानली जाते.

गंगेवरील अनेक घाट प्रसिद्ध आहेत. दशाश्वमेध घाट, शीतला घाट, मणकर्णिका घाट, पंचगंगा घाट, संगम घाट, रामगनगर घाट इत्यादी.

काशी-बनारस हे क्षेत्र जसे पवित्र धर्म तीर्थ आहे तसेच ते ज्ञानपीठही असून 'प्राच्यविद्येचे माहेरघरच' आहे. पं. मदनमोहन मालवीय यांनी येथे हिंदु विश्वविद्यालय स्थापले. त्याच्या आवारात शिवछत्रपतींचा पुतळा आहे.

श्री विश्वेश्वर ज्योतिर्लिङ्गाच्या दर्शनासाठी लाखो लोकांचा लोंढा वाराणशीला वाहत असतो. 'जय गङ्गे ऽऽ' 'जय विश्वनाथ', 'ॐ नमः शिवाय' या घोषणांनी आसमंत सतत दुमदुमलेला असतो.

इति शिवम्। क्रमशः

**दि. दा. औटी**

## 'शिशुपाल वध' - जाती भूपती

राजसूय यज्ञामधे अती वाचाल
अवमानित करतो सज्जनांस शिशुपाल
अपराध साहले त्याचे हरिने फार
पापाचा भरता घडाच केले ठार ॥धृ ॥

भीष्मांना धर्म पुसे अतिलीनच भावे
अवभृथस्नान करण्याआधीच करावे
कोणते असे मज कार्य तुम्ही सांगावे
ज्या योगे येई पूर्ती यज्ञा थोर ॥१॥

क्षणमात्र चिंतुनी वदले ते धर्मासी
पूजावे त्वां जमलेल्या नृपश्रेष्ठांसी
दे मान अग्रपूजेचा तू कृष्णासी
ज्या कृपे होतसे यज्ञ तुझा साकार ॥२॥

आनंदाने हरि धर्म पूजता झाला
पाहता दृश्य शिशुपाला क्रोधच आला
वळुनी मुष्टी चेदिपती क्षुब्ध म्हणाला
ना केला धर्मा तू काहीच विचार ॥३ ॥

ना पाहिलेस तू सभेतील वडिलांस
का दुर्लक्षिलेस अमुच्या पराक्रमास
पूजले प्रथम तू अधम अशा गवळयास
धजलास कसा हा करावया आचार ॥४॥

शिशुपाल किती बरळला काहिच्या बाही
लाखोली अपशब्दांची कृष्णा वाही
वगळले त्यातुनी नाही भीष्मांनाही
विस्मीत सभा ऐकता कठिण उच्चार ॥ ५॥

ऐकोनीही ना करि गोपाल विरोध
चेदिपती मातेच्या वचनाने बद्ध
हो पूर्ण तयाचे जेव्हा शत अपराध
गोपाल म्हणे मी शिक्षा देइन घोर ॥६॥

शिशुपालाने सारे राजे चेतवले
युद्धाचे कृष्णाला आव्हानच दिधले
त्या वेळी त्याचे कुकर्म मापहि भरले
तत्क्षणी सुदर्शन चक्र निघे बाहेर ॥७॥

सोडले हरीने त्यावर चक्र अभेद
शिशुपाल शिराचा क्षणात होई छेद
ये प्रचिती ज्या वचनासी वदले वेद
ब्रीदा पाळी हरि करी दुष्ट संहार ॥८ ॥

दुर्योधनाला पांडवांचं बरं पाहवत नव्हतं, साहवत नव्हतं. वारणावतची चाल अयशस्वी ठरल्यावर पांडवांना नेस्तनाबूत करण्याचे अन्य मार्ग तो शोधतच होता. राजसूय यज्ञाहून परतल्यावर त्यानं आपला मामा शकुनी याच्याशी संधान बांधलं. शकुनी कपटद्यूत खेळण्यात प्रवीण होता. क्षात्रधर्माचं प्राणपणानं पालन करणारा युधिष्ठिर द्यूत खेळण्याचं आमंत्रण नाकारू शकणार नाही हे दुर्योधनाला माहिती होतं. शकुनीच्या सहाय्यानं द्यूतात पांडवांचं सर्वस्व हिरावून घेऊन त्यांना देशोधडीला लावायला तो सिद्ध झाला.

इंद्रप्रस्थाहून पांडव द्रौपदीसह हस्तिनापुरात येऊन दाखल झाले. कौरवांच्या अंतःपुरात तिला सोडून ते राजसभेत द्यूत खेळायला निघून गेले. द्रौपदी त्यावेळी रजस्वला होती, एकवस्त्रा होती.

तिनं वारंवार धर्माला विनंती केली होती की आपण हे आमंत्रण स्वीकारू नये, मला याच्यात काही काळबेरं दिसतंय. परंतु धर्मराजानं तिला निक्षून सांगितलं होतं की द्यूत खेळण्याचं आमंत्रण नाकारणं हा क्षत्रियधर्माचा अवमान आहे. हे अधर्माचरण तो कदापिही करणार नाही. हताश झालेली द्रौपदी आता अस्वस्थ मनानं राजसभेचा मार्ग पुन्हापुन्हा अवलोकन करत होती.

तोच त्या मार्गावर खालच्या मानेनं येत असलेला प्रातिकामी तिच्या दृष्टीस पडला. तिच्याजवळ आल्यावर मान न उचलता कष्टानं एकएक शब्द उच्चारत तो म्हणाला, ''देवी, दुर्योधन महाराजांनी आपण राजसभेत ताबडतोब यावं अशी इच्छा व्यक्त केली आहे.''

संतापानं उठून द्रौपदी म्हणाली, '' मला अशा अवस्थेत बोलवण्याचा त्यांना काय अधिकार?''

खिन्न स्वरात प्रातिकामी म्हणाला, ''त्यांनी आपल्याला द्यूतात जिंकलं आहे.''

हे ऐकताच सुन्न होऊन द्रौपदी मटकन खालीच बसली. प्रातिकामीनं पांडव द्यूतात राज्यासकट, स्वतःसकट, तिच्यासकट सर्वस्व हरल्याचं वृत्त तिला कथन केलं. ते ऐकताच त्याही परिस्थितीत विचार न सोडलेली ती पतिव्रता म्हणाली, ''महाराज युधिष्ठिर आता माझ्यावर हक्क कसा सांगू शकतात? जेव्हा ते स्वतःला पणाला लावून हरले तेव्हाच त्यांनी तो हक्क गमावला! म्हणून त्यांनी नंतर मला पणाला लावणं आणि दुर्योधनानं मला जिंकणं हे अनैतिक आहे, अवैध आहे. मी भरतकुलाची स्नुषा आहे. या घडीला रजस्वला आहे. मी आत्ता राजसभेत येणं हे कुठल्याच दृष्टिनं उचित नाही. कृपया आपण माझा हा निरोप राजसभेत कौरवांसहीत सर्व ज्येष्ठांनादेखील निवेदन करावा.''

प्रातिकामी एकदा, दोनदा रिक्तहस्तानं परत आलेला पाहून उतावीळ दुर्योधनाच्या संतापाला पारावार उरला नाही. त्यानं दुःशासनाला लागलीच आज्ञा केली, ''जा दुःशासना, त्या बटकीला तू स्वतः जाऊन ताबडतोब घेऊन ये. असेल तशी घेऊन ये. ती जर बऱ्या बोलानं येत नसेल तर तिला फरफटत घेऊन ये...''

**'द्रौपदी लज्जारक्षण' - वृत्त पृथ्वी**

द्युती हरविता करी विकट हास्य दुर्योधन
जटा धरुन द्रौपदी त्वरित आणि दुःशासन
पडे करितसे बळे रुदन म्लान ती द्रौपदी
पडोनि विनवी स्वये सकळ कौरवांच्या पदी ॥१॥

नसे किमपि जे घडे परम ते कुळा भूषण
विवेक गत पांडवा कठिण देतसे दूषण
अधोमुख तिचे पती नजर होतसे खालती
नशीब फिरले पडे उलट खेळले चाल ती ॥२॥

सभेमधिल सज्जना करित द्रौपदी आर्जवे
मुळी न चळती तिच्या चमकती पुढे काजवे
अशी निरखता तिला प्रबळ दैत्य तो मातला
तिचे वसन फेडण्या अधम हस्त हा घातला ॥३॥

अती बिकट त्या क्षणी नयन ते मिटोनी उरी
करां उभय जोडुनीच अबला स्मरे श्रीहरी
जरी प्रकट त्या स्थळी नच हरी स्वये होतसे
तरी पुरवुनी तिला वसन लाज रक्षीतसे ॥४॥

अखेर थकला पुरा गलितगात्र दुःशासन

हरी झुरत लावण्या प्रखर कौरवा शासन
विधीलिखित त्या क्षणी अटळ कौरवांचे ठरे
मुकुंद निववी जनां करुन नीज ब्रीदा खरे ॥५॥

द्यूतात हरल्यावर पांडवांनी बारा वर्ष वनवास आणि एक वर्ष अज्ञातवास भोगावा असं ठरलं. त्यानुसार पांडव काम्यक नावाच्या एका वनात स्थायिक झाले. कृष्णाला सारं वृत्त कळतच होतं. त्याला आता पांडवांना, विशेषतः द्रौपदीला, भेटण्याची तळमळ लागली होती. संधी मिळताच रथ जोडून तो जातीनं काम्यक वनात पांडवांच्या कुटीपाशी दाखल झाला.

त्याला पाहून पांचालीचे सारे बांध फुटले. ''कृष्णा, काय रे आमची ही अवस्था!'' असं म्हणून तिनं स्वतःला त्याच्या पायांवर घालून घेतलं. तिला पाहून कृष्णाचं हृदय भरून आलं. तो म्हणाला, ''शाल्वानं द्वारकेवर केलेला हल्ला परतवण्यात मी गुंतलो होतो म्हणून. नाहीतर जे झालं ते मी कदापी घडू देतो ना!''

''त्यावेळी माझे मोकळे केस धरून त्या दुष्टांनी माझी धिंड की रे काढली.'' द्रौपदी स्फुंदत म्हणाली, ''हयाचा सूड घेतला गेल्याशिवाय आता मी माझे केस परत कधीही बांधणार नाही.''

भीम कराकरा दात खात आवेशानं द्रौपदीला म्हणाला, ''ज्या दुःशासनानं तुझे हे केस धरले त्याच्या रक्तानं माखलेल्या हातांनी मी तुझे केस फिरून बांधेन. दुर्योधनानं आपल्या ज्या अंकावर तू बसावं म्हणून भर राजसभेत अश्लील संकेत केले तो अंक मी माझ्या गदेनं भंग करेन!''

द्रौपदी त्यावर उसळून म्हणाली, ''शब्द! केवळ पोकळ शब्द! जे माझी विटंबना थांबवू शकले नाहीत ते त्या विटंबनेचा सूड घेऊ शकतील असा विश्वास मी कसा बाळगू?''

यावर कृष्ण आश्वासक सुरात वदता झाला, ''द्रौपदी, करावं तसं भरावं हा सृष्टिनियम सर्वांना सारखाच लागू आहे. आपल्या कर्माची फळं कौरव भोगल्याशिवाय रहाणार नाहीत हे ब्रह्मवाक्य समज!''

बराच वेळ मग कृष्ण पांडवांच्या भळभळत्या जखमांवर फुंकर घालत त्यांना निववत राहिला.

पांडवांचे वनवासात दिवसामागून दिवस जात होते. त्यांनी आता आपला मुक्काम द्वैतवनात हलवला होता. अर्जुनानं हिमालयात तपश्चर्या करून पाशुपतास्त्र मिळवलं होतं.

शरत्काल सुरू झाल्यावर एके दिवशी कृष्ण सत्यभामेला बरोबर घेऊन फिरून त्यांना भेटायला आला. पाशुपतास्त्राच्या प्राप्तीबद्दल त्यानं अर्जुनाचं अभिनंदन केलं. द्रौपदीनं भामेला प्रेमभरानं आलिंगन दिलं. कृष्णानं काही दिवस द्वैतवनातच व्यतीत करायचं ठरवलं.

एका रम्य पहाटे द्रौपदी आणि सत्यभामा एका तळ्याकाठी जाऊन गूजगोष्टी करत बसल्या. त्या प्रसंगी भामेनं विचारलं, ''सखी,

(पृष्ठ १५ वर)

## श्री साईबाबांचा अमृतप्रसाद ''उदी''

वसंत गोडबोले

श्रीसाईबाबांचे ''श्रद्धा व सबुरी'' हे वाक्य जसे त्यांचे नांव घेतल्याबरोबर स्मरते तसेच श्रीसाईबाबा म्हटले की त्यांचा अमृतप्रसाद ''उदी'' हे सर्व साईभक्त जाणतातच. श्रीसाईबाबा व उदी ही अविभाज्य गोष्ट आहे. साई म्हणजेच उदी व उदी म्हणजेच साई असे हे एकरुपत्व आहे. ही उदी म्हणजे श्रीसाईबाबांचे जणू आत्मतत्वच आहे. उदीच्या रुपाने श्रीसाईबाबा भक्तांची आधिदैविक, आधिभौतिक व अध्यात्मिक संकटे / आघात नष्ट करतात. मग तो पृथ्वीच्या पाठीवर कोठेही का असेना. ''मज शरण आला काया वाचा मनी । तयाचा मी ऋणी सर्वकाळ ।।'' हे साईनाथांचे ब्रीदच आहे. खऱ्या भक्तांचे ऋणाईत असणारे श्री साईनाथ भक्तरक्षणार्थ सदैव कटीबद्ध आहेत यात शंकाच नाही. उदीच्या रुपाने बाबा ''जरी गेलो मी हे शरीर टाकून । तरी मी धावेन भक्तांसाठी ।।'' हे त्यांचे वचन प्रत्यक्षात आणताहेत असे समजण्यास प्रत्यवाय नाही. ही उदी म्हणजे जणू संजीवनीच आहे. बाबांचे अलौकिक दिव्य योगसामर्थ्य व परब्रह्मतत्वच या उदीमध्ये आहे. या उदीला कोणताही जाती, धर्म, वंश, लिंग, गरीब-अमीर, उच्च-नीच, काळा-गोरा इ. शरीरवर्ण व प्रकार नाहीत. तिचा उपयोग करण्यास वा तीचे वापरावर अडसर ठरण्यास तसेच स्थळ, काळ, वेळ, पवित्रता, शुचिर्भूतता, मुहूर्त इ. चा पण कसलाही बंध नाही. फक्त भावभक्ती व श्रद्धा हेच तिचे मूल्य व त्यावरच तिचे गुणधर्माचे आविष्करण व सबुरी हाच कालावधी. ना पथ्यापथ्य, ना मात्राप्रमाण, सेवनविधीप्रकारमर्यादा, ना तिला कालबाह्यता वा उपयोगात अमुक एक कालावधीत आणण्याचे बंधन. उदी ही कालातीत, बंधनातीत अमुल्य औषधी आहे. हे साईबाबांनी भक्तांना दिलेले नक्षत्रांचे देणे आहे. उदीकरता कोठलेही मूल्य/शुल्क नाही. फक्त भावभक्तीचे नाणे श्रीसाईबाबांना द्यावे लागते एवढेच.

उदीचा व्यावहारिक अर्थ ''राख'' असा आहे. अंगारा, विभूती, रक्षा, भस्म इ. शब्दही समानार्थी आहेत. पदार्थ जळून गेल्यावर जी रक्षा उरते तिला राख म्हणतात. घन पदार्थ उदा. लाकूड, कोळसा, कागद इ. पूर्ण जळल्यावरच ही राख उरते. द्रव पदार्थ गॅस इ. जळल्यानंतर त्यांची रक्षा उरत नाही, हा फरक लक्षात घ्यावा.

आपल्याकडे ''यज्ञ'' संस्कृती पूर्वापार चालत आलेली आहे. यज्ञकुंडातील रक्षा पवित्र विभूती म्हणून नेतात. भगवान शंकरही अंगावर विभूती धारण करतात तसेच भगवान दत्तात्रेयही भस्म सर्वांगास लावतात. आपणही घरात धूप, उदबत्ती देवापुढे लावतो, तिची रक्षा कपाळी लावतो, रक्षा हातात घेवून रामरक्षापठनाने ती अभिमंत्रित करुन कपाळी लावतात. सायंकाळी विशेषता लहान मूल व आजारी माणसांना यामध्ये रामरक्षेचे सामर्थ्य/

दिव्यत्व त्या रक्षेमध्ये तेथे व ती रक्षा एकप्रकारचे कवच बनते. दुष्ट शक्तींचा प्रतिकार करणारे व तिची अभिमंत्रितता दुष्ट शक्ति विनाश करते, ही श्रद्धा जनमानसात दृढमूल आहे. तसेच अंगारा व विभूती वा भस्म सायंकाळी घरात फुंकुन तसेच दरवाज्याबाहेर फुंकूनही दुष्ट अघोरी शक्तिचा बिमोड होतो या श्रद्धेने अनेक घरात ही प्रथा आहे. गाणगापूरचे भस्म इ. पण काही जण ताईतात घालून तो गळ्यात धारण करतात वा त्याची पुडी खिशात बाळगतात. काही जण घरी धनपेटीतही ठेवतात. ह्या सर्वातून एकच निष्कर्ष निघतो तो म्हणजे रक्षा, विभूती, भस्म यात एक दिव्य संरक्षक शक्ती असते व ती मानवास तारक ठरते. हा श्रद्धेचा प्रश्न आहे व याचे वैज्ञानिक दृष्ट्या स्पष्टिकरण वा सिद्धता प्रयोग / उपकरणाद्वारे देणे अशक्य आहे हे येथे स्पष्ट करणे आवश्यक आहे. हा भावनेचा प्रश्न आहे. हा अंतःकरणाचा प्रश्न आहे उपकरणाचा नाही हे लक्षात ठेवावे मुस्लीम धर्मात सुद्धा उद जाळणे हा पूजा / अर्चनेचा प्रकार आहे. देवदेवतांचे अंगारे अनेक ठिकाणी वा देवालयांत मिळतात. काही ठिकाणी तर ते विकलेही जातात. साधुसंत, वैरागी, फकीरही भस्म/विभूती अंगास लावतात. भस्माचे पट्टे उभे / आडवे कपाळी, दंडांवर, मनगटांवर, छातीवर उमटवतात. कसेही असले प्रकार तरी त्या सर्वामागे श्रद्धा हाच एकमेव स्थायी भाव आहे.

परमेश्वर महादेवांना चिताभस्मही प्रिय आहे. म्हणजे रक्षा, राख, विभूती इ. प्रकार हे देवांपासून जनसामान्यात विशिष्ट स्थान मिळवून आहेत. हे सर्व लिहिण्याचे कारण श्रीसाईबाबा जी उदी देत असत त्या उदीला वा राखेला एक विशिष्ट मान भारतीय संस्कृतीत (सर्व धर्मात कदाचित) नक्की आहे. संत समाजात ज्या गोष्टीला / वस्तुला परंपरागत स्थान व मान आहे, जनमानसाधार आहे त्या विशिष्ट गोष्टी विशिष्ट कार्यासाठी विशिष्ट प्रकारे वापरतात, त्यापैकीच एक उदाहरण म्हणजे श्रीसाईबाबांची जनमानसात विशेषतः साईभक्तमरिवारात अत्यंत पूज्य शिरोधार्य मानली जाणारी अमृतप्रसाद ''उदी''

श्रीसाईबाबा द्वारकामाईत राहण्यास आल्यावर त्यांनी काही कालावधीनंतर त्यांचेकडे येणाऱ्या रोगाने पीडित भक्तांना औषधे देण्यास सुरवात केली. साईबाबांची औषध योजना विचित्र असे. परंपरागत औषधी काढे, भस्म, मलमे या सर्वांना त्यात स्थान नसे. मुलखावेगळी परंपरेस धक्का देणारी ही औषधे असत पण त्यामुळे रोग/व्याधी झपाट्याने बऱ्या होत. त्याऔषधांबरोबर काही पथ्येही बाबा सांगत असत. ही वैद्यकीय सेवा त्यांनी सुरु केली विनामूल्य. तो एक धडाकेबाज उपक्रम ते जोरात चालवू लागले. दुःखितांचे दुःखहरण हा जणू वसाच घेतला. लोकही काहीही झाले की लगेच त्यांचेकडे धाव घेत. डोळे आले तर बाबा त्यावर बिब्बे बांधून ठेवित. विशिष्ट प्रकारचा काढा करुन स्वहस्ते सक्तीने पाजत व वर पंढरपुरी डाळे खाण्यास देत त्यांच्या उपचार औषधीत बेलाचे फळ,

पाने इ. चा प्रयोग जास्त असे, असे वाचले आहे. या त्यांच्या वैद्यकीचा त्यांनी त्याग केला जेव्हा एक रुग्ण त्यांनी सांगितलेले पथ्यापाणी न पाळल्याने दगावला. जन पथ्यपाणी जर नीट पाळणार नाहीत तर औषध लागू कसे होणार? म्हणून त्यांनी औषधे देणे पूर्णपणे बंद केले आणि येथुनच पुढे त्यांनी उदी देऊन रोग बरा करण्याची प्रथा / प्रघात सुरु केला. ''हा उदीयुगाचा प्रारंभ होय.''

बाबांनी उदी द्यायला सुरवात केली ती उदी म्हणजे द्वारकामाईत त्यांनी प्रज्वलीत केलेल्या धुनीतली रक्षा. या रक्षेचा उपयोग जनसामान्यांच्या तिन्ही प्रकारच्या आधीव्याधी निरसण करण्यार्थ त्या उदीमध्ये बाबांनी आपली दिव्य शक्ती प्रेरित करुन केला व ही दिव्य शक्ती त्या उदीत अक्षय ठेवलेली आहे. म्हणूनच तिची प्रचीति तेव्हाही येत होती आजही येत आहे व भविष्यातही येतच राहणार यात तिळामात्रही शंका नाही. भक्त जेवढा साईचरणी अनन्यभावे लीन तेवढी जास्त प्रचिती हे समीकरण आहे अध्यात्माचे.

या उदीद्वारे श्रीसाईबाबांनी एक संदेशही दिला आहे. उदी हे विवेक व परमार्थाचे प्रतिक, माणसाचे शरीर नश्वर आहे म्हणून शरीर जोपर्यंत धडधाकट आहे तोपर्यंत परमार्थ साधा असे त्यांना सुचवायचे होते. ''श्रीसाईसत्चरित'' या पोथीत वेगवेगळ्या अध्यायात श्रीसाईबाबांनी त्यांचे भक्तांना श्रीरामरुपात दर्शन दिल्याचे उल्लेख आहेत व त्यामुळेच त्यांनी निर्मिलेली धुनी व त्यातून मिळणारी उदी रामरक्षेइतकीच प्रभावी आहे, पवित्र आहे, रक्षक आहे.

बाबा जरी उदी देत होते तरी त्यांनी तिची महती कधीच जाहीररित्या मांडली नाही वा तशी जाहीरातही केली नाही का उदो उदो केला नाही. प्रसंगोपात् त्यांनी काही उद्गार काढले ते त्या विशिष्ट प्रसंगी उदी देतांनाच पण त्यातूनही उदीचा कीर्ति सौरभ दरवळला आसमंतात तो आजतागायत अक्षय आहे.

बाबा द्वारकामाईत त्यांनी प्रज्वलीत केलेल्या धुनीत जाळण्यासाठी लाकडाच्या मोळ्या स्वतः खरेदी करत असतं रोख रक्कम देऊन. ती लाकडे धुनीत जाळत व धुनीतील राख उदी म्हणुन देत. शिर्डीतून परततांना बाबांची परवानगी घ्यावीच लागे व ती मागायला भक्त बाबांकडे जात तेव्हा जर बाबा उदी आणा म्हणाले तर बाबांची आज्ञा / परवानगी झाली असे समजत कारण परततांना उदी देवूनच पाठविण्याचा त्यांचा परिपाठ / शिरस्ता होता, पण शिर्डीत मुक्काम असतांना मध्यान्ही व सकाळी संध्याकाळी बाबा दर्शनास येणाऱ्यांना उदी देत नसत तर रिकाम्या हातानेच पाठवित. हाच रोजचा क्रम होता.

उदी ही द्वय तत्वाचे संयुग आहे. पहिले तत्व म्हणजे श्रीसाईनाथांचे त्यात असलेले दिव्य योग शक्ती/सामर्थ्य तत्व व दुसरे प्रतिकात्मक श्री साईबाबांचे उपदेश तत्व. या उदीबद्दल श्रीसाईसत्चरित पोथीत अध्याय ३३,३४ व ३५ मध्ये वर्णन आहे. त्यातील अध्याय ३३ मधील खालील ओव्या ओवी

क्र. (११ ते १९ व २४ ते २७) श्रीसाईबाबांचे उपदेशतत्त्व स्पष्ट करतात. त्या ओव्या अशा :- ''विभूती दानी मनोगत । बाबा काय सुचवीत । हे दृश्य सकळ विश्वांतर्गत । राख हे निश्चित मनी उमजा ।।११।। देहही पंचभूतांचे काष्ठ । भोग भोगावया अवशिष्ट। भोग सरता पडेल निश्चेष्ट । होईल विस्पष्ट ही राख ।।१२।। तुमची माझी हीच स्थिती । तियेची तुम्हास व्हावी स्मृती । अहर्निश मजही जागृति । तदर्थ विभूति देतसे ।।१३।। अखिल विश्व मायाविंजूभित । ब्रह्म सत्य, ब्रह्माण्ड अमृत । त्याची खूण उदी सत्य । निश्चितार्थ हा माना ।।१४।। येथे नाही कोणी कोणाचे । दारा, पुत्र, मामे, भाचे । नग्न आलो नग्न जायाचे । उदी त्याचे स्मारक ।।१५।। उदीने या केलीया चर्चन । अधिव्याधी होती निरसन। परी उदीचा तत्वार्थ गहन । विवेकपूर्ण वैराग्य ।।१६।। आले जरी वैराग्य हाती । विवेक जरी नाही सांगती । तरी त्याची होईल माती । म्हणून विभूती आदरा ।।१८।। विवेक वैराग्याची जोड । तीच विभूती दक्षिणेची सांगड। बांधिल्यावीण भवनदीची थड । अति अवघड गाठावया ।।१९।। संसार आह उदीसमान । हे एक या उदीचे महिमान । येईल ऐका एक दिन । मनी आठवण ही ठेवा ।।२४।। कमल-दल-जलसमान । नश्वर हा देह होईल पतन। म्हणूनी याचा त्यागा अभिमान । उदीप्रदान दावी हे ।।२५।। सकळ विश्वाचा हा पसारा। राखरांगोळीसम निर्धारा । करा जगन्मिथ्यत्व विचारा । सत्यत्वा थारा उदीत ।।२६।। उदी म्हणजे केवळ माती । नामरुपाची अंतिम गती । वाचारंभण विकार जगती । मृत्तिके प्रतीती सत्यत्वे ।।२७।।''

हे श्रीसाईबाबांचे उपदेशतत्व त्या उदीद्वारे जरी मिळते तरी जनसामान्यांना उदी ही एक अनमोल अजोड औषधी वा उपाय म्हणूनच भावते कारण त्यांना हवी असते आधिव्याधी मुक्ती. संसारी जनांची हीच वृत्ती असते. अत्यल्प लोकच हे उपदेशतत्त्व आकलन करतात व पारमार्थिक वृत्तीस बळकटी आणतात. व्यावहारिक जगात बहुसंख्य लोक चिंता, भय, रोग, आपत्ती, मनिषापूर्ती यासारख्या कारणांसाठी उदीचा प्रयोग करतात. म्हणूनच बाबांनी त्यांची दिव्य योगशक्ती त्या उदीमध्ये अक्षय संक्रमित केली आहे. आजही ही उदी भक्तांचे आधिव्याधी निरसणार्थ उपयोगी पडत आहे. जणू बाबाच उदीरुपाने हे कार्य करीत असून ''नित्य मी जिवंत, जाणा हेचि सत्य । नित्य ह्या प्रचित अनुभवे ।।'' या वचनाचे प्रमाण देत आहेत. ज्याप्रमाणे नृसिंह सरस्वतींनी गाणगापुरात ''निर्गुण पादुका'' अक्षय शक्तिसामर्थ्याने भारित करुन भक्त कल्याणार्थ ठेवल्या आहेत, कुरवपूर पीठापूर येथे श्रीपाद श्रीवल्लभांच्या पादुका आहेत तसेच श्रीसाईबाबांनी ''उदी'' रुपाने स्वशक्ति जन/भक्त कल्याणार्थ ठेवली आहे.

बाबांची उपदेशवाणी उदीरुपे काय संदेश देते ते वर ओव्यात आले आहेच. त्यातील महत्वाचे मुद्दे/तत्वार्थ खालीलप्रमाणे आहेत :-

१) दृश्य होणारे सगळे विनाश होणारे आहे. त्याची राखच वा माती होणार आहे.

२) देश हा पंचमहाभूतांचा भोग संपल्यावर त्यातील चैतन्य विलय होऊन काष्ठासारखा होणार व शेवटी त्याची राखी होणार.

३) तुमची माझी हीच अवस्था होणार आहे याची मला जाणीव असल्यानेच ही उदी/ विभूती मी देत आहे.

४) ब्रह्म चिरंतर अक्षय तर ब्रह्माण्ड नाशवंत आहे, याची खूणच ही विभूती/उदी

५) या जगात कोणी कोणाचे नसते. सर्व नाती गोती नाशवंतच आहेत. उघडे अंगाने आपण येतो व उघड्या अंगानेच जातो याचे उदी हे स्मारक आहे.

६) विवेकपूर्ण वैराग्य हा उदीचा गूढ अर्थ आहे.

७) विवेक नसलेले (अविवेकी) वैराग्य लयासच आते. त्याची राखच होते म्हणून वैराग्यास विवेकाची जोड हवी याच अर्थाने ह्या उदीचा आदर करा.

८) संसाराची अंतिम अवस्था रक्षाच आहे ही उदीरुपाने आठवण ठेवा. (संसार अशाश्वत आहे त्याचे कितीही पोषण केले तरी अंती त्याची राखच होणार आहे)

९) देहाचा व संसाराचा नाशच होणार. या अशाश्वत गोष्टींचा अभिमान धरु नका. त्या खोट्या नाशवंत गोष्टींचा अभिमान त्याग करा हेच मी उदीदेतांना दाखवित आहे. हाच संदेश उदीदानात माझ्या आहे.

१०) विश्वपसारा राखरांगोळी होणारा अशाश्वत नाशवंत. ''ब्रह्म सत्य, जग मिथ्या'' हे तत्व सत्य आहे. हेच सत्यतत्व उदीचा अर्थ आहे.

११) उदी म्हणजे केवळ राख, माती, नामरुपाचे अंतिम गतीरुप या जगात राखच, म्हणून उदी हे हेच मृत्तिकातत्वाचे सत्य रुप आहे.

अर्थात हा उपदेश त्यांनाच समजेल जे साईबाबांची भक्ती परमार्थप्रगतीसाठी करतात. कारण साईबाबांकडे येणारे ९५ टक्के भक्तव्यावहारिक लाभासाठी / कामनापूर्तीसाठी / संकटमुक्तीसाठी / व्याधी मुक्तता यासाठीच येतात. आध्यात्मिक प्रगती / व्यावहारिक जगातून दूर जाऊन परमार्थ प्राप्ती यासाठी केवळ ५ टक्केच भक्त येतात हे सत्य आहे. उदी ही दोन्ही वर्गातील भक्तांना वरदायिनी आहे. जो जे वांछिल तो ते लाहो'' असे तिचे फळ आहे पण ते त्यांनाच मिळेल जे अनन्यभावे श्रीसाईबाबांना शरण जातील. ही उदी जी संकटे / आपदा विपदा निवारण करते ती तीन वर्गात मोडतात. १) आधिदैविक २) आधिभौतिक ३) आध्यात्मिक. यांची थोडी / संक्षिप्त ओळख / माहिती करुन घेणे उचित ठरेल कारण उदी या सर्वांवर रामबाण उपाय आहे.

१) आधिदैविक व्याधी / पीडा : या विज्ञानाद्वारे सिद्ध करता येत नाहीत. तसेच त्याचे प्रमाणही देता येत नाही. भूतबाधा, पिशाच्चबाधा, करणी, भानामती, पितरपीडा, नजरबाधा, दृष्ट इ. सारखे हे व्याधिरुप

असते. या व अशाच प्रकारच्या वास्तुदोषादि पीडा या प्रकारात येतात. त्यांचे प्रमाण कसलेच देता येत नाही व सिद्धही करता येत कोणत्याही प्रकारे वैज्ञानिक प्रयोग/उपकरणे यांनी. म्हणून विज्ञाननिष्ठ युगात हे प्रकार व व्याधी हास्यापदच ठरतात व त्यांची खिल्ली उडविली जाते तरी पण त्यांनी ग्रस्त जन आढळतात व त्यासाठी नवस/सायास केले जातात. आजही दत्तस्थाने (गाणगापूर, नरसोबावाडी, औदुंबर) व अन्य देवदेवतांची जागृत स्थाने येथे या व्याधीनी ग्रस्त लोक मोठ्याप्रमाणावर येतात. तसेच जागृत संतसमाधीस्थळे– शिर्डी, शेगाव इ. ठिकाणीही गर्दी अशा लोकांचीही असते, हे उघड सत्य आहे. हा केवळ आणि केवळ श्रद्धेचाच भाग आहे एवढे खरे. श्रीसाईबाबांनी ''उदी'' ने ही व्याधि नष्ट  केली आहे. त्याची काही उदाहरणे पुढील अंकी... (क्रमशः )

**वसंत गोडबोले**
फ्लॅट नं.५, दीपाली अपार्टमेंटस्,
१२४, शनिवार पेठ (नेनेघाट),
पुणे - ४११०३०
भ्रमणध्वनी : ९४२३८५८८२३

●●●

(पृष्ठ क्र.९ वरून ... **गीतकृष्णायन भाग ४ – योगेश्वर**)

अनेक दिवस माझ्या मनात घोळत असलेली एक गोष्ट आज मी तुला विचारत्येय. तुझे पती सदैव तुला अनुकूल असतात, वश असतात. कृष्णाचं आणि माझं नातंही तसंच दृढ व्हावं म्हणून तू मला सांग की तू करतेस तरी काय? तू त्यांच्या सर्व इच्छा प्राणपणानं पूर्ण करतेस? की त्यांना विविध पाककृतींद्वारे वश करून घेतेस? की उत्तम शब्दलाघव दाखवून त्यांचं रंजन करतेस? की कामशास्त्रात वर्णन केलेले विविध शृंगार करून तू त्यांना आपलंसं केलयंस? की एखादी चेटुक विद्या अथवा संमोहनशास्त्रातला एखादा मंत्र तुला अवगत आहे? तू माझी मैत्रीण आहेस म्हणून मी तुला मोकळ्या मनानं हे विचारत्येय. मला तू हे रहस्य सांग ना!''

यावर किंचित् स्मित करून द्रौपदी म्हणाली, ''भामे, याचं एकमेव रहस्य म्हणजे मी पतिव्रता धर्माचं कसोशीनं पालन करते.''

भामा आतुरतेनं म्हणाली, ''मग तो धर्म मला तू आत्ताच कथन करिनास...''

**प्रसाद दि. औटी**
न्यू अजंठा अव्हेन्यू, बि. नं.३ बी.-१,
६ वा मजला, ब्लॉक नं. १८,
पौड रोड, कोथरूड, पुणे - ४३३ ०३८
दूरध्वनी : ०२०-२५४५००८९
मोबाइल : ९८८११०४०७४

●●●

प्रथमतः अध्यात्म किंवा आध्यात्म म्हटल्यावरच सर्व साधारण माणूस संसारिक जरा दचकतोच-बिचकतोच! अध्यात्मिक, परमार्थिक किंवा देव-देवतार्जन हे उतारवयातील विषय असाच समज आहे. त्यातूनही एखादा या मार्गाला वळलाच तर त्याला उपरोधीकपणे हिणवले जाते किंवा ''करून करून भागले आतां देवपूजेला लागले'' असे ऐकावयास मिळते. धार्मिक अध्यात्मिक विषयाबद्दल उदासीनताच दिसते.

आपला देह पंचमहाभूतांपासून बनलेला आहे हे सर्व जाणतात व तो सत्व, रज, तम या गुणांनी युक्त आहे. सर्वसाधारण माणूस हा तम व रजोगुणी आहे. तमोगुणापासून रजोगुण व पुढे सत्व गुणात प्रवेश करणे म्हणजे अध्यात्म मार्गाला पात्र होणे होय. सर्व तऱ्हेचे गुन्हे, वाईट विचार, कुसंगती, कुबुद्धी, धर्माबद्दल उदासीनता, बलात्कार, खून-दरोडे, कुठलाही विधीनिषेध न मानणे म्हणजे तमप्रवृत्ती म्हणता येईल. सर्व तऱ्हेचे भोगलालसा, ऐष आराम, संपत्तीची हाव, आत्यंतिक स्वार्थी बुद्धी व अतृप्ती म्हणजे रजोगुणीवृत्ती म्हणता येईल. धर्माचरण असले तरी स्वतःची सोय व सुखलोलूपता हाच प्रत्येक कर्माकडे बघण्याचा यांचा दृष्टिकोन आढळतो. तमोगुणी किंवा रजोगुणी, धार्मिक कार्य करतांना आढळले तरी ते सहेतुक व व्यापारी दृष्टीने करताना दिसतात. परोपकार ही परत फेडीच्या भावनेने केलेले आढळतात. यातूनच सत्संगती लाभून वाचन, चिंतन, मनन करून मानव प्राणी सत्वगुणाकडे वळलेला दिसतो. सर्व प्रयत्न संपले, अंधार दिसू लागला की बुद्धी कुंठीत होते. तेव्हा देव धर्माकडे, अध्यात्माकडे प्राणी वळतो. तो जन्मतः उच्च कुळात असल्यास, स्वाभाविकतः सत्वगुणी, सत्कर्मी, निःस्वार्थी, सत्याने, न्यायनीतिने वागणारा आढळतो. तो पापभिरु असतो. मानवाची वृत्ती विशिष्ठ तऱ्हेने घडत जाण्यास आहार, विहार व विचार यांचाही पगडा असतो. ''जसा जयाचा आहार असे। तशी तयाची बुद्धी। म्हणूनी सात्वीक अन्न सेवने। साधी अंतः शुद्धी'' असे प. पू. स्वामी स्वरुपानंदानी एके ठिकाणी म्हटले आहे. म्हणजे आध्यात्मिक विचार बनायला आहार अन्नही कारणीभूत होत असते.

पूर्वापार आणि विशेषतः आज-काल जो तो सुखाच्या, पैश्यांच्या/संपत्तीच्या पाठीमागे लागलेला दिसतो. आत्यंतिक सुखासाठी धावपळ, गडबड, विद्या, ज्ञानसाधना, व्यापार, उद्योग धंदा इ. चाललेली धडपड पाहिली की ''जगी सर्वसूखी असा कोण आहे? विचारी मना तूच शोधोनी पाहे'' हे समर्थाचे बोल आठवतात व पुढे तेच दासबोधातून सांगतात ''किर्ती पाहता सुख नाही। सुख पाहता किर्ती नाही'' प्रत्येक क्षेत्रात मानवाची प्रगती झालेली दिसते पण

मती कुंठीत झाली, अंधार दाटला, अपयश आले की ज्ञानप्रकाश दिसू लागतो. अनन्य शरणागती व अगतीकता मानवाला अध्यात्म प्रवण करते. गूढशक्ती काय आहे, अंतःप्रेरणा म्हणजे काय, मी कोण, कशासाठी जन्माला आलो व या जीवाला कार्य काय, गती काय असे अध्यात्मिक विचार सुचू लागतात. स्वतःचे भोवतीचे जग मिथ्या आहे हे पटू लागते. मी धडपड करत आहे, काही वेळेला निसर्गाविरुद्ध, स्वतःचे उत्कर्षासाठी, वेळप्रसंगी दुसऱ्याला बळी देऊनही धनसंपत्ती मिळवत आहे. ''उपजे ते नाशे, नाशले पुनरपि दिसे'' हे घटिका यंत्र सतत चाललेले पाहतो. आत्यंतिक सुखासाठी कमवलेली विद्या, वैज्ञानिक शोध अपुरेच पडतात. स्थूळ म्हणजे लौकिक विद्या, 'भासमान व तात्पुरती गरज भागवणारी' आहे हे पटते आणि मन सुक्ष्म गूढ विद्येकडे म्हणजेच अध्यात्मिक ज्ञानाकडे वळते.

''सकल विद्यांमाजी गहन। अध्यात्म विद्या श्रेष्ठ पावन। स्वभावे जी जीवालागोन। बंधनापासून मुक्त करी।।'' असे प. पू. स्वामी स्वरुपानंदांनी सांगितले आहे. तर दासबोध म्हणतो -

''तैसाच हाही नानापरी। बहुत जनास शहाणे करी। नाना विद्या त्या विवरी। स्थूळ सूक्ष्मा।। दा.११-७-१६

बहुत प्रकारींची ज्ञानें। सांगो जाता असाधारणे। सायोज्यप्राप्ती होय-जेणे। ते ज्ञान वेगळे।। दा.५-५-३७

ऐक ज्ञानाचे लक्षण। ज्ञान म्हणजे आत्मज्ञान। पाहावे आपणासी आपणा। या नांव ज्ञान।। दा.५-६-१

आज मोठ मोठे शोध लागूनही मनुष्याचे जीवन सुखी नाही उलट भयग्रस्तच आहे. माणसाची हाव संपत नाही. लौकीक विद्या अपुरी पडते आहे. स्वार्थ बोकाळला आहे. 'मी' शिवाय काही सूचत नाही. मी, मला, माझे बस्स!

प्रापंचिक, व्यावहारिक, पारमार्थिक अथवा अध्यात्मिक कोणतेही कर्म असले तरी त्यापासून आनंद सुखच व्हावयास पाहिजे. ''काय ही रोजची कट कट'' असे रोजचे कर्म करताना वाटता कामा नये. प्रत्येक कर्मात, गोष्टीत जर आनंद मिळत नसेल तर जीवन आनंदाचे कसे होणार? प्रत्येक कर्म आनंदरुप होते कीं नाही हे पाहणे अगत्याचे आहे. भक्ती करताना, पूजा, तीर्थ यात्रा करताना, नाम घेताना आनंद झाला पाहिजे. मन निर्मल होण्यासाठी नामस्मरणाची कांस धरणे आवश्यक आहे आणि याची आवड व संस्कार लहानपणीच झाले पाहिजेत. तेव्हां अध्यात्म विचार-विद्या लहान वयापासून मिळाल्यास जीवन आत्मनिर्भर होईल. जन्म मृत्यूची भीति नाहीशी होईल. आज माणसाला सर्वात जास्त भीती मृत्यूची-मरणाची वाटते. मृत्यू टाळण्याचा प्रत्येक प्रयत्न दुःखी करत आहे. सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत म्हणजचे जन्मापासून ते मृत्यूपर्यंत जीवन अशांत, कटकटीचे व भयग्रस्त झाले आहे. शाश्वती कशाचीच नाही. मग क्षणभंगूर

जीवनाची आसक्ती कमी होणार कीं नाही हा प्रश्न आहे. याच्यासाठी 'स्व' ला विसरणे व ध्यान धारणा आवश्यक आहे. ध्यानाला बसल्यावर पाच मिनिटात सगळे विषय शांत, निर्विकार झाले पाहिजेत. विचार जरी आले तरी आपला त्याच्याशी यत्किंचीतही संबंध ठेवता कामा नये. ते येतील आणि जातील, त्यांना पकडून ठेऊ नका. विचारांवर विचार न करता हळूहळू मन एकाग्र करा. मन शांत लीन होणे आवश्यक आहे. तप, भक्ती, ध्यान, अध्यात्म इ. शब्द वाचले, ऐकले कीं वाटते बस एक माळ घ्यावयाची दुर्वा, फुले वहावयाची व कुठेतरी अरण्यात जाऊन बसायचे म्हणजे सर्व झाले. म्हणून भिती वाटते. मन साशंक बनते, घाबरते, हा प्रांत आपला नव्हे असाच समज होतो. त्यातूनही पटलेच तर मन म्हणते अरे आत्ताच कशाला करु मग वृद्धपणी उतारवयात पाहूं। शरीराची अवस्था काय कायम सुदृढ रहाणार? काळ कुणासाठी थांबतो काय, त्याची खात्री आहे काय?

बाह्य कर्मकांडाला गीता मानत नाही. शरीरशुद्धी, मनःशुद्धी, वाचा शुद्धी, बुद्धी शुद्धी करणे याला गीता तप म्हणते. गीतेचे सारे तत्त्वज्ञान या जीवनाची उंची वाढवणारे आहे. संपूर्ण देह, मन, बुद्धी ही उंच पातळीवर नेऊन सारेच्या सारें जीवन त्यागी करणे व उत्तम पुरुष घडवणे गीता जाणते. आदर्श जीवनाचा वस्तुपाठ विचार रामायण देते म्हणून स्वराज्यातही म. गांधीजींनी रामराज्य साकारण्याची अपेक्षा केली. प्रार्थना केल्याने, नाम घेतल्याने, ध्यान केल्यानेच मनुष्य 'मी देह नाही' या बोधावर येतो. निःसंग होतो. सर्वसाधारणतः विचार प्रसंग इ. विषय, चूक-बरोबर, नैतिक-अनैतिक, पाप-पुण्य, स्वच्छ-अस्वच्छ, लैंगिकता, आक्रमकता, अशांतता व अतृप्ती या भोवती घोटाळत असतात. जन्मोजन्मी, पिढ्यान् पिढ्या त्रस्त करत असतात. मनाची बिकट अवस्था होते. मन विचारांचे जंजाळ तोडण्याची हिंमत करत नाही. स्वतःमध्ये बदल करण्याचा धीर करत नाही. मनाचा ताठरपणा, कठोरपणा, हट्टी-आडमुठेपणा व अत्यंत जिव्हाळ्याचा आत्मकेंद्रीतपणा सोडण्याचा विचारसुद्धा येत नाही, जो अध्यात्मिक विचारांचा पाया आहे. मनाची दारे सताड उघडली पाहिजेत. दृष्टी साफ व्हावयास पाहिजे व सर्व जगाला प्रेममुद्रा लावून दयाद्र नजरेने पहाणे, बघणे, पारखणे म्हणजे अध्यात्म विचार. सध्या मी, मला, माझे हीच दृष्टी!

आजच्या जीवनात निकोप जीवन व्यतीत करण्यासाठी शांत, सुखी समृद्ध जीवनासाठी, आत्यंतिक आनंद व आत्मिक आनंद प्राप्त होण्यासाठी अध्यात्मिक विचारच तरणोपाय आहे. संत महात्म्यांनी संपूर्ण जीवन यासाठी व्यतीत केले आहे. विषय गहन किचकट, विस्तृत, व्याप्ती फार मोठी आहे; हे तर खरेच पण समर्थांनी म्हटल्याप्रमाणे या नांव शिष्या आत्मज्ञान। येणे पाविजे समाधान। भवभयाचे बंधन। समूळ मिथ्या।।

दा.५-६-५४

(पृष्ठ २५ वर)

## ज्ञानोबांच्या शब्दांत सकल-विद्या-कला-निधि गणपतीची ओळख

प्र. सि. मराठे

ज्ञानेश्वरीला प्रारंभ करताना पहिल्याच ओवीत ज्ञानेश्वरांनी निर्गुण निराकार, सर्व विश्वाचा निर्माता धाता आणि नाशिता अशा सर्वव्यापी ब्रह्मतत्त्वाला केवळ चार विशेषणांनी संबोधून नमन केले आहे.

ती ओवी अशी –

**ॐ नमो जी आद्या । वेद प्रतिपाद्या ।**
**जय जय स्वसंवेद्या। आत्मरुपा ।।१।।**

ॐकार रुपी ब्रह्मतत्त्वांचा जय-जयकार करुन ज्ञानोबांनी त्याला नमन करण्यासाठी पहिल्याच ओवीत चार संबोधनात्मक विशेषणे अशी योजिली आहेत, की अप्रत्यक्षपणे सर्व वेदविद्येचे जणू सारच ते अत्यंत 'संकुचित स्वरुपात' वाचकांपुढे ठेवत आहेत असे भासते. सर्व ब्रह्मांड ज्यातून उद्भवले, त्या सर्व विश्वाचे 'आदि' (Causeless Cause) जे ब्रह्मतत्त्व त्याला 'आद्या या विशेषणाने प्रथम संबोधिले आहे. हे ब्रह्मतत्त्व निर्गुण निराकार असल्यामुळे आपल्या पंचेन्द्रियांना अगोचर आहे. त्यामुळे सामान्य माणसांना ते अगोचरच आहे. ज्या योगीसाधकांना त्याचा अनुभव आला आहे, त्यांनाही ते शब्दातीत असल्यामुळे त्याचे शब्दात वर्णन करुन सांगता येत नाही. वेदांनाही त्याचे वर्णन करताना नेति-नेतिंचाच आश्रय घ्यावा लागला, हे वेद प्रतिपाद्या या संबोधनात अभिप्रेत आहे. असे असले तरी हे ब्रह्मतत्त्व सर्वव्यापी असून ते प्रत्येकाच्या अंतरात 'अन्नमय', 'प्राणमय' 'मनोमय' 'विज्ञानमय' आणि 'आनंदमय' अशा पंचकोशांनी वेष्ठित असलेले जणू 'निहितं गुह्ययाम्' असे 'आत्मरुपात' वसत असते आणि ते योगसाधनेने माणसाला अन्तर्यात्रा करुन ही पाचही वेष्ठणे भेदून आत्मरुपदर्शनातच अनुभवायचे असते हे वेदविद्येचे सारच त्यांनी 'स्वसंवेद्या' आणि 'आत्मरुपा' ही दोन संबोधने वापरुन अप्रत्यक्षपणे सुचित केले आहे असे म्हणावे लागेल.

अशा बह्मतत्त्वाला (परमात्म्याला) प्रथम वंदन करुनच पुढे ज्ञानोबा अव्यक्त ब्रह्मतत्त्वाचे बीजात्मक चिन्ह जे ॐ त्याचे सगुणात्मक प्रतीक मानल्या गेलेल्या गणपतीचे दुसऱ्या ओवीपासून स्तवन करीत आहेत. दुसऱ्या ओवीपासून विसाव्या ओवीपर्यंत केलेल्या गणपतीच्या स्तवनात ज्ञानोबांनी गणपतीचे केलेले काव्यात्मक वर्णन केवळ अप्रतिम आहे.

प्रथम ज्ञानेशांची प्राकृतातील ओवी, नंतर त्या ओवीचे सद्य-भाषेतील अनुष्टुपांत (श्लोकांत) भाषांतर व शेवटी भावार्थ सांगणारा गद्यात अनुवाद या क्रमाने ओवी-निहाय भावार्थ खाली दिला आहे.

**ओवी २-**

देवा तूंचि गणेशु । सकलार्थ-मति-प्रकाशु।
म्हणे निवृत्तिदासु । अवधारिजो जी ।।२।।

**श्लोक -**

ज्ञानदेव म्हणे आता ज्ञानबुद्धिप्रकाश तू ।

गणेशा ऐक, सांगे मी, प्रेरसी जे मलाच तू ।।२।।

भावार्थ – गणेशा तू केवळ ज्ञानसूर्यच आहेस, तुझ्या ज्ञान-प्रकाशाच्या प्रेरणेनेच मी सांगणार आहे ते (श्रोत्यांनी) ऐकावे असे सांगून गणेशाच्या निरनिराळ्या अवयवांचे ज्ञानोबा पुढील ओव्यांत रुपकात्मक वर्णन करत आहेत.

**ओवी ३**

हे शब्दब्रह्म अशेष । तेचि मुर्ति सुवेष ।
तेचि वर्णवपु निर्दोष । मिरवत असे ।।३।।

**श्लोक –**

शब्दब्रह्मचि जे वेद, तुझी मूर्ति मनोहर।
तुझ्या अक्षरकायेचे झळके तेज सुंदर।।३।।

**भावार्थ** – शब्दब्रह्म जे वेद तेच तुझ्या मनोहर मूर्तीत प्रकटले आहेत.आणि त्यांचे तेजच तुझ्या कांतीतून झळाळत आहे.

**ओवी ४**

स्मृति तेचि अवयव । रेखा अंगीकभाव । तेथ लावण्याची ठेव । अर्थ शोभा ।।४।।

**श्लोक –**

स्मृति या मूर्तिचे अंग हावभाव चि श्लोक ते।

श्लोक-आशय-लेण्यांचे तळपे अंगि तेज ते ।।४।।

**भावार्थ** – स्मृती याच जणु या मूर्तीचे अंग आहेत. त्या अंगाचे हावभाव म्हणजेच गीतेचे श्लोक आहेत आणि त्या श्लोकांचा आशय (अर्थ) म्हणजेच कोणी अलंकार त्या अंगावर तेजाने झळकत आहेत.

**ओवी ५**

अष्टादश पुराणें । तीच मणिभूषणें । पदपद्‌ती खेंवणें । प्रमेयरत्नांची ।।५।।

**श्लोक –**

अष्टादश पुराणे ती, रत्नांचे जणु दागिने ।
जणु तत्त्वार्थ-रत्नांना, शब्द-कोंदणिं स्थापिले ।।५।।

**भावार्थ –** वेदान्त-तत्त्वांच्या रत्नांना शब्दांच्या कोंदणात बसवून रचलेली अठरा पुराणे हेच जणु दागिने तुझ्या अंगावर शोभत आहेत.

**ओवी ६**

पद्यबंध नागर । तेचि रंगाथिलें अंबर । जेथ साहित्य वाणें सपूर । उजाळावे ।।६।।

**श्लोक –**

काव्य आशय सुश्राव्य गणेशाचा पितांबर ।
काव्यालंकार जणु ते, त्याचे योत चकाकित ।।६।।

**भावार्थ –** त्या काव्याचा आशय हाच तुझा पितांबर आहे आणि काव्यालंकार रुपाने त्या पितांबराचे पोत चकाकत आहे.

**ओवी ७**

देखा काव्य नाटका । जे निर्धारितां सकौतुका ।
त्याचि रुणझुणती क्षुद्रघंटिका ।
अर्थध्वनि ।।७।।

**श्लोक –**

जणु घुंगूर-माला ची काव्याशयपदांचि ती ।

घुंगूर रुणझूणूनी जणु काव्यार्थ सांगती ।।७।।

**भावार्थ –** त्या काव्यांतील शब्दांच्या जणु घुंगूरमालाच रुणझुण स्वरांनी काव्यार्थ सांगत आहेत.

**ओवी ८**
नाना प्रमेयांची परी । निपुटपणें पाहतां कुसरी ।
दिसती उचित पदें माझारी । रत्नें भलीं ।।८।।

**श्लोक –**
नाना प्रमेये अध्यात्मीं योग्य शब्देंचि वर्णिली।
विचाररुप रत्ने ती शोभती शब्द कोंदणी ।।८।।

**भावार्थ –** अध्यात्म शास्त्रांतील निरनिराळे सिद्धांत हीच जणु विचाररुपी रत्ने शब्दांच्या कोंदणात शोभत आहेत.

**ओवी ९**
तेथ व्यासादिकांच्या मती । तेचि मेखळा मिरवती ।
चोखाळपणे झळकती । पल्लवसडका ।।९।।

**श्लोक –**
व्यासादिकांची प्रतिभा जणु हेरंब–मेखला ।
झळके मेखला – टोके त्यांच्या बुद्धीचि तीक्ष्णता ।।९।।

**भावार्थ –** यांच्या कमरेवरील मेखला (कमरपट्टा) हीच जणु व्यासादिक कवींची प्रतिभा आहे व त्या मेखलेवरील चकाकणारा 'तास' त्यांच्या बुद्धीची तीक्ष्णता दर्शवीत आहे.

**ओवी १०**
देखा षड्दर्शनें म्हणिपती । तेचि भुजांची आकृति।
म्हणऊनि विसंवादें धरिती । आयुधे हातीं ।।१०।।

**श्लोक –**
गणेशाचे सहा हात जणु षडदर्शनेच ती ।
दर्शनें ज्यापरी भिन्न भिन्न शस्त्रे धरी करी ।।१०।।

**भावार्थ –** या गणेशाचे सहा हात म्हणजे जणु षड्दर्शनेच होते आणि ती षड्दर्शने जशी भिन्न त्याप्रमाणे निरनिराळ्या प्रकारची शस्त्रे त्याने सहा हातांत धारण केली आहेत. (१०)

**ओवी ११**
तरी तर्कु तोचि परशु । नीतिभेदु अंकुशु ।
वेदांतु तो महारसु । मोदकु मिरवे ।।११।।

**श्लोक –**
हाती परशु तर्काचा न्यायाचा आणि अंकुश ।
अध्यात्म–परमानंद जणू तो हाति मोदक ।।११।।

**भावार्थ –** एका हातात तर्काचा परशु तर दुसऱ्या हातात न्यायाचा अंकुश त्याने धारण केले आहेत. [कोणत्याही शास्त्रातील (नियम) सिद्धांत तर्कावर घासून व न्यायाच्या अंकुशाने ठराविक मर्यादेतच ग्राह्य धरला जाता हेच सत्य ज्ञानोबा गणेश वर्णनात किती सहजपणे सांगून जातात हे लक्षणीय आहे.] पुढे ते सांगातात की त्याच्या हातातील मोदक म्हणजे आत्मज्ञानाने मिळणाऱ्या परमानंदाचेच चिन्ह आहे. (११)

**ओवी १२**
एके हातीं दंतु । जो स्वभावतः खंडितु ।
तो बौद्धमतसंकेतु । वार्तिकांचा ।।१२।।

**श्लोक –**
वार्तिकांच्या प्रभावाने बौद्धांचा शून्यवाद जो ।
झाला खंडित त्याचेची प्रतीक भग्न दंत तो ।।१२।।

**भावार्थ –** वार्तिकांच्या प्रभावाने खंडित झालेला बौद्धांचा शून्यवाद हाच जणु तुटलेला दात त्याने हातात धरला आहे.

**ओवी १३**

मग सहजें सत्कारवादु । तो पद्मकरु वरदु ।
धर्मप्रतिष्ठा तो सिद्धु । अभयहस्तु ।।१३।।

**श्लोक–**

सतर्कवाद ऐसा तो त्याचा वरदहस्तच ।
धर्मप्रतिष्ठा टिकवी त्याचा अभयहस्तच ।।१३।।

**भावार्थ –** त्याचा वरदहस्त जणु 'ॐ तत् सत्' हा वैदिक मूलमंत्रच दर्शवीत आहे. तर दुसरा हात वेदप्रणीत धर्मप्रतिष्ठा राखणारा जणु अभयहस्तच आहे.

**ओवी १४**

देखा विवेकवंतु सुविमळु । तोचि शुंडादंड सरळु ।
जेथ परमानंद केवळु । महासुखाचा ।।१४।।

**श्लोक –**

विवेकी मन ते शुद्ध परमानंद दायक ।
स्थिती मोक्षसुखाची ही 'श्री' ची सरळ सोंडच ।।१४।।

**भावार्थ –** गणेशाची सरळ सोंड म्हणजे स्थितप्रज्ञ वृत्तीने जेथे परमानंद प्राप्त होतो, अशा योग्यांच्या ब्राह्मीस्थितीचेच चिन्ह आहे.

**ओवी १५**

तरी संवादु तोचि दशनु । जो समताशुभ्रवर्णु ।
देवो उन्मेषसूक्ष्मेक्षणु । विघ्नराजु ।।१५।।

**श्लोक –**

शुद्धता साम्यबुद्धीची शुभ्र दन्तचि दर्शवी ।
दाविती सूक्ष्म ते नेत्र तत्त्वग्राहीच दृष्टि ती ।।१५।।

**भावार्थ –** गणेशाचे शुभ्र दन्त जणु साम्यबुद्धीची शुद्धता दर्शवितात तर त्याचे लहान सूक्ष्म डोळे म्हणजे सूक्ष्मतत्त्वग्राही दृष्टीच दर्शवितात

**ओवी १६**

मज अवगमलिया दोनी । मीमांसा श्रवणस्थानीं ।
बोधमदामृत मुनी । अली सेविती ।।१६।।

**श्लोक –**

मीमांसा पूर्व उत्तर त्या, दोन्ही कर्णामधे स्थित ।
आत्मबोधमदा तैसे मुनी–भ्रमर सेवित ।।१६।।

**भावार्थ –** या गणेशाच्या दोन्ही कानांमध्ये पूर्व व उत्तर मीमांसाच वसत आहेत असे भासते. याच्या गंडस्थळातील 'मद' म्हणजेच आत्मबोधरुपी अमृत, मुनी भ्रमररुपाने सेवन करीत आहेत.

**ओवी १७**

प्रमेय प्रवाल सुप्रभ । द्वैताद्वैत तेचि निकुंभ ।
सरिसेपणें एकवटत इभ–। मस्तकवारी ।।१७।।

**श्लोक –**

द्वैताद्वैत विचारांचे गंडस्थलि द्विविभाग ते।
सिद्धांत आत्मबोधाचे प्रवाळ मोति ही तिथे।।१७।।

**भावार्थ –** याच्या गंडस्थळाचे दोन विभाग म्हणज जणु द्वैत व अद्वैत विचारांची मतेच आहेत. गंडस्थळावर विराजणारे प्रवाळ–मोती म्हणजे जणु आत्मबोधातील सिद्वांतच शोभत आहेत.

**ओवी १८**

उपरी दशोपनिषदें । जियें उदारे ज्ञानमकरंदे ।
तिथें मुगुटीं कुसुमें सुगंधें । शोभती भली ।।१८।।

**श्लोक –**
ज्ञान सुगंधे भरली दशोपनिषदेच जी ।
वाहिली जणु पुष्पे ती मुकुटावरि शोभती ।।१८।।

**भावार्थ –** उदात्त ज्ञान सुगंधाने भरलेली उपनिषदे (ईश-मुण्डकादि मुख्य दहा) ही त्याच्या मुकुटावर वाहिलेल्या फुलांप्रमाणे शोभत आहेत.

**ओवी १९**
अकार चरणयुगल । उकार उदर विशाल ।
मकारु महामंडळ । मस्तककारें ।।१९।।

**श्लोक**
'अ'कार दोन्ही चरण, 'उ' होईच महोदर ।
'म' सही मस्तकी त्याच्या, ऐसा (अउम) ॐ हो गजानन ।।१९।।

**भावार्थ –** गणेश म्हणजे ॐ या बीजाक्षराचे प्रतीक होय. त्यातील (पहिली मात्रा) 'अ' म्हणजे स्थिर बसलेल्या स्थितींतील (मांड्या) दोन पाय होत. 'उ' (दुसरी मात्रा) म्हणजे त्याचे महोदर, तर 'म' (तिसरी मात्रा) त्याचे जणु मस्तकच होय.

**ओवी २०**
हे तिन्ही एकवटले । तेथ शब्दब्रह्म कवळले ।
तें मिया श्रीगुरुकृपा नमिले । आदिबीज ।।२०।।

**श्लोक –**
होता 'अ' 'उ' 'म' एकत्र, वेदांचे बीज ब्रह्म ॐ जे ।
गुरुनि दाविले मज, त्या आदिबीजास मी नमे ।।२०।।

**भावार्थ –** हे 'अ' 'उ' 'म' एकत्र झाले (ब त्यावर ँ ची अर्धमाला घातली) म्हणजे जो ॐ कार होता तेच वेदांचे मूळ 'सत्त्व' (बीजाक्षर मंत्र) म्हणजे खरोखरीच शब्दब्रह्मच होय. त्या शब्दब्रह्मालाच (जे गुरुंनी मला दिले) मी नमन करतो याप्रमाणे गणपती रुपांतील ब्रह्मतत्त्वालाच ज्ञानोबा नमन करीत आहेत.

टीप – या विसाव्या ओवीबरोबर गणपती-स्तवन समाप्त झाले. २१ व्या ओवीपासून ज्ञानोबांचे वाग्देवी सरस्वतीचे स्तवन सुरु होते.

**विवरण –**

ज्ञानेश्वरी हा गीतेवरील टीका ग्रंथ आहे असे ज्ञानेश्वरांनीच म्हटले आहे. गीतेच्या प्रत्येक श्लोकाचा अर्थ गुह्यार्थासहित समजावून सांगण्यासाठी त्यांनी अनेक ओव्या रचल्या आहेत.

गीतेच्या पहिल्या अध्यायाच्या पहिल्या श्लोकावर निरुपणाला सुरुवात करण्यापूर्वी त्यांनी घातलेल्या (मंगलाचरणवजा) ८४ ओव्या म्हणजे ज्ञानोबांच्या काव्यप्रतिभेच्या आविष्काराच्या एक अप्रतिम नमुनाच आहे. पहिल्या ओवीत त्यांनी ॐ कार रुपी ब्रह्मतत्त्वाला [ज्याचे गणपती हे सगुण रुप (चिन्ह) आहे.] चार विशेषणांनी संबोधून त्याचा जयजयकार केला आहे. त्यांनी ती चार विशेषणे अशी योजिली आहेत की त्यांच्या गर्भित अर्थाने सर्व वेदाविद्येचे सारच वाचकांपुढे ठेवत आहेत असे भासेल. वैदिक तत्त्वज्ञानात मानवासाठी सांगितलेल्या अंतिम पुरुषार्थाचेचे (आत्मा-परमात्मा मीलनाचे)

दर्शन ज्ञानोबांनी ज्ञानेश्वरीच्या या पहिल्याच ओवीत वाचकांना करुन दिले आहे. हा केवळ योगायोग नसून ज्ञानोबांनी आपल्या असीम दैविक बुद्धीनेच नियोजनपूर्वक ही ओवी रचिली आहे असेच म्हणावे लागेल.

आपण साधारण कोणत्याही कार्याला आरंभ करण्यापूर्वी गणपतीचे स्तवन करतो असाच प्रधान आहे. परंतु ज्ञानोबांनी पहिल्या ओवीत विश्वातील एकमेव सनातन सत्य जे ब्रह्मतत्त्व (परमात्मा) त्याचे स्तवन केले आहे. ब्रह्मतत्त्वाचे प्रतीक जो ॐकार त्याच्या सगुण स्वरुपात मूर्त झालेल्या श्रीगणेशाचे स्तवन दुसऱ्या ओवीपासून सुरु केले आहे, हे लक्षणीय आहे.

सगुण देवतेची पूजा करताना त्या मूर्तीच्या प्रत्येक अवयवाची पूजा करुन त्याला गंध पुष्प वाहण्याची क्रिया विधियुक्त पूजनात सामावलेली असते. ज्ञानोबांनी दुसऱ्या ओवीपासून गणपतीच्या प्रत्येक अवयवाचे स्तवन फार अनोख्या रीतीने केले आहे. देहाच्या हस्तपादादि अवयवांबरोबर ज्ञानोबांनी गणपतीच्या पितांबर, घुंगुर माला, मेखला व दागिने यांचाही काव्यमय रुपकांनी वर्णनपर उल्लेख केला आहे. त्याच्या दागिन्यात त्यांना वेदांच्या तत्त्वांच्या रत्नांना शब्दांच्या कोंदणात बसवून रचलेली पुराणे दिसतात. तर त्याच्या पितांबराचे पोत त्यांना काव्यप्रतिभेच्या तेजाने चकाकत आहे असे भासते. व्यासदिकांची प्रतिभा व तिची तीक्ष्णता त्यांना गणेशाच्या मेखलेच्या चकाकणाऱ्या तासात भासते. त्याच्या हातातला परशु तर्काचा तर अंकुश न्यायाचा प्रतिनिधित्व करतो आहे असे ते म्हणतात.

शब्दब्रह्म जे वेद त्यांना गणपतीच्या मनोहर मूर्तीत प्रकटलेले दिसतात, तर वैदिक ज्ञानाचा प्रकाश त्यांना गणपतीच्या तेजस्वी कांतीतून बाहेर पडताना दिसतो. गणपतीच्या सहाभूजा म्हणजे जणु षड्दर्शनेच होत असे वर्णन करून त्यांनी वैदिक वाङ्गमयाबरोबर षड्दर्शनांचे महत्त्वही कथन केले आहे. गणपतीचा एक तुटलेला दंत म्हणजे सातव्या शतकात आद्यशंकाराचार्यांनी भारतभर फिरुन बौद्धविचारांच्या केलेल्या खंडनाचेच प्रतीक आहे असे त्यांना भासते. ज्यांना वेदान्त म्हणून ओळखले जाते ती मुख्य दहा उपनिषदे ज्ञानोबांना गणपतीच्या मुकुटावर वाहिलेल्या सुगंधी पुष्पांत सामावलेली दिसतात. ॐ बीजाक्षरांच्या 'अ' 'उ' आणि 'म' या तीन मात्राही गणपतीच्या चरण, उदर आणि मस्तक या अवयवांतच सामावलेल्या आहेत हे सांगून गणपती हे ॐ बीजाक्षराचेच सगुण रुप कसे आहे हे ज्ञानोबा ठासून सांगतात.

वेदान्त तत्त्वज्ञानातून निघालेल्या द्वैतवादी व अद्वैतवादी या दोन्ही पक्षांचा सन्मान करुन त्यांचा समन्वय साधण्यासाठी ज्ञानोबानी त्यांना गणपतीच्या गंडथळाच्या दोन उंचवट्यावर मोठ्या युक्तीनं स्थानापन्न केले आहे.

कष्टसाधनाने योगसिद्धी मिळवून ब्रह्मतत्त्वाचे आत्मरुपात दर्शन होणे (त्याला अनुभवणे) हा मानवासाठी सर्वांत मोठा पुरुषार्थ आहे असे वेदविद्या सांगते आणि असे आत्मदर्शन झाल्यावर अनुभवास येणारा

परमानन्द हा केवळ भौतिक नव्हे तर स्वर्गीय आनंदापेक्षाही शतकोटीपटीहून मोठा असतो असेही उपनिषदे सांगतात. गणपतीच्या हातातील मोदक म्हणजे अशा त्या अतुल्य परमानंदाचेच प्रतीक आहे असेही ज्ञानोबा सांगतात. ब्रह्मतत्त्व व त्याच्या प्राप्तीचे मार्ग सांगणारे उपनिषदे-दर्शने-पुराणादि ग्रंथ व ब्रह्मप्राप्तीनंतर मिळणारा परमानंद या सर्व विषयांना गवसणी घालून, ब्रह्मतत्त्वाच्या गणपती या सगुण रुपात या सर्व गोष्टी कशा सामावलेल्या आहेत हेच ज्ञानोबांनी गणपती - स्तववनात अप्रत्यक्षपणे रुपक अलंकार योजून दाखवून दिले आहे.

टीप -

विष्णुसहस्त्र नाम स्तोत्रांतील शेवटचे १००० वे नाम 'सर्वप्रहरणायुधः' असे आहे. ब्रह्मतत्त्वाचा 'शस्त्र-धारक' हा पैलूही ज्ञानेश्वरांच्या दृष्टीतून निसटला नाही. ज्ञानेश्वरांच्या दृष्टीतून निसटला नाही. गणपतीच्या सहा भूजांना सहा-दर्शनांची उपमा देताना. षड्दर्शने जशी भिन्न आहेत त्याप्रमाणे भिन्न प्रकारची आयुधे त्याने हातात घेतली आहेत असे वर्णन ते १० व्या ओवीत करतात.

समाप्त

**प्र. सि. मराठे**
४०२ सनफ्लॉवर, ठक्कर पार्क,
वाकोला, सांताक्रूझ (पूर्व),
मुंबई - ४०००५५
दूरध्वनी - २६६७२२०५
भ्रमणध्वनी - ९६१९८९६४३५

●●●

(पृष्ठ क्र.१८ वरून... **आध्यात्म विचारांची आजची गरज!)**

तोपर्यंत म्हणजे मरेपर्यंत शिकत रहाणे व स्वामी स्वरुपानंदांनी सांगितलेली विद्या मिळवणे, प्राप्त करून घेणे एवढेच आपण करु शकतो.

१) आनंदी जन्म जी घेते। आनंदे विश्व कोंदते।
आनंदे लीन जी होते। ती विद्या मिळवूं इथे।।''
स्वामी स्वरुपानंद

२) मी माझे मावळो सर्व तूं तुझे उगवो आता।
मी तू पण जगन्नाथा होवो एकची तत्वता।।
- स्वामी स्वरुपानंद.

स्वामी स्वरुपानंदांचे हेच मागणे मागावयाचे कारण, अध्यात्म विचारच जगाला तारुन नेतील हे निर्विवाद.

**मोहन लिमये**
बी ३, अक्षय सोसायटी,
सिटी पोष्टासमोर, पनवेल,
जि. रायगड - ४१० २०६.
भ्रमणध्वनी : ७०४५७६९४५७

●●●



# कौटिल्यीय अर्थशास्त्र (राजाचे शिक्षण)

डॉ. वैशाली जयंत दाबके

यापूर्वीच्या लेखात 'विनय' या गुणाचे व्यक्तिमत्त्वविकासाच्या दृष्टीने असलेले महत्त्व आपण पाहिले. विनय म्हणजे मनुष्यावर केले जाणारे बाह्यसंस्कार तसेच त्याने स्वतःवर केलेले संस्कार. परंतु स्वतःवर संस्कार करण्याची क्षमता मनुष्याकडे जन्मतःच नसते. माता, पिता, गुरु इ. ज्येष्ठ व्यक्तींचे मार्गदर्शन आणि औपचारिक शिक्षण यांनी ही क्षमता मनुष्यास प्राप्त होते.

राजाने प्राप्त करायच्या अशा औपचारिका शिक्षणाविषयी कौटिलीय अर्थशास्त्रात सविस्तर विचार केला आहे. राजाला मार्गदर्शन करण्यासाठी रचलेल्या या ग्रंथात पहिल्या विनयाधिकरणातील पहिले प्रकरण 'विद्यासमुद्देश' म्हणजे 'राजाने शिकण्यासाठी योग्य अशा विद्यांचा क्रमवार विचार' हे आहे. राजनीतिविषयक सर्व विषय हाताळणाऱ्या सर्वांगपरिपूर्ण अशा या ग्रंथात 'राजाचे शिक्षण' या विषयाला अग्रक्रम असावा यावरुनच 'राजाचे शिक्षण' हा कौटिल्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा विषय आहे हे वेगळे सांगायला नको.

राजाने शिकण्यास योग्य अशा विद्यांविषयी कौटिल्याने प्रथम पूर्वसूरींची मतमतांतरे दिली आहेत. जसे 'मानव' म्हणजे मनूच्या अनुयायांच्या मते त्रयी, वार्ता आणि दण्डनीती या तीन विद्या आहेत, 'बहिरचत्य' म्हणजे बृहरचतीच्या अनुयायांच्या मते वार्त्ता आणि दण्डनीति या दोनच विद्या आहेत तर 'औशनस' म्हणजे शुक्राचार्यांच्या मतानुसार राजाने दण्डनीती ही एकच विद्या शिकावी. पूर्वसूरींची मते सांगितल्यावर कौटिल्य स्वतःचे मत सांगतो 'चतस्त्रः एव विद्याः!' आन्वीक्षिकी, त्रयी, वार्त्ता आणि दण्डनीती या चार विद्या आहेत. राजाने या चार विद्या शिकण्याचा उद्देश काय? या विद्यांत कोणते विषय समाविष्ट होतात हे कौटिल्याने 'विद्यासमुद्देश' अध्यायातील तीन प्रकरणांत स्पष्ट केले आहे. वरील चार विद्यांचे स्वरुप, महत्त्व आता अनुक्रमे पाहू.

**आन्वीक्षिकी –** आन्वीक्षिकी म्हणजे तर्कविद्या (Logic) आन्वीक्षिकीविद्येत सांख्य योग आणि लोकायत दर्शनांचाही समावेश आहे. तर्कविद्या म्हणजे आन्वीक्षिकी विद्येमुळे मनुष्याची विवेकबुद्धी जागृत होते. धर्म–अधर्म, अर्थ–अनर्थ, योग्य–अयोग्य, न्याय–अन्याय यांतील भेद समजून योग्य निर्णयापर्यंत पोहोचण्यासाठी या विद्येचा हातभार लागतो. एकदा विवेकबुद्धी जागृत झाली की अभ्युदयाचा काळ असो अथवा संकटाचा राजाची बुद्धी विचलित होत नाही. या विद्येच्या अभ्यासामुळे विचार, उच्चार आणि आचार यांच्यात एकवाक्यता निर्माण होते. तसेच कोणतीही ज्ञानशाखा अथवा ज्ञेयविषय साक्षेपी भूमिकेतून जाणून घेण्यास सहाय्य होते.

**त्रयी–**त्रयी म्हणजे ऋग्वेद, यजुर्वेद

आणि सामवेद या तीन वेदांचा समूह. प्रारंभी परंपरेने या तीन वेदांनाच मान्यता दिली होती. मात्र नंतर या तिन्हींसह अथर्ववेदाचा ही समावेश वेदांमध्ये झाला. या चार वेदांसह 'इतिहास' या विषयाचा अंतर्भावही कौटिल्याने त्रयीविद्येत केला आहे. वेदाभ्यासासाठी, शिक्षा, कल्प, व्याकरण,निरुक्त, छंद, ज्योतिष या सहा अंगाचे अध्ययन करावे लागते. त्यामुळे सहा वेदांगे, चार वेद आणि इतिहास या सर्वांचा समावेश त्रयी विद्येत होतो. 'वेदविद्येचा राजाला काय उपयोग?' हा प्रश्न वाचकांच्या मनात येईल. परंतु कौटिल्य म्हणतो की या विद्येच्या अध्ययनाने चार वर्ण आणि चार आश्रम यांची आपापली विशिष्ट कर्तव्ये म्हणजे स्वधर्माचे ज्ञान होते. प्राचीन भारतीय समाजरचना वर्णाश्रमपद्धतीवर आधारित होती. वर्णाश्रमधर्मानुसार कर्मे करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य होते आणि प्रजेतील प्रत्येक व्यक्ती स्वधर्मपालन करते की नाही हे पहाणे राजाचे कर्तव्य होते. कौटिल्य म्हणतो राजाने प्रजेला स्वधर्मापासून च्युत होऊ देऊ नये. स्वधर्मांचे पालन झाले नाही तर समाजाची घडी विस्कळीत होते. असुरक्षितता, अव्यवस्था, अशांतता निर्माण होते. हे होऊ नये म्हणून त्रयीविद्येचे ज्ञान आवश्यक आहे.

वेदांपैकी विषेशतः अथर्ववेदात जारणमारण, काळीजादू याविषयीचे तसेच राजकर्माविषयीचे मंत्र आहेत. शत्रूशी लढताना या कूट उपयांचा प्रयोग करावा असे कौटिल्याने 'औपनिषद्' या अधिकरणात म्हटले आहे. म्हणून अथर्व वेदाचा अभ्यास आवश्यक आहे.

त्रैयाविद्येतील इतिहास या विद्येच्या अभ्यासामुळे पूर्वसूरी राजांनी आचरणात आणलेली धोरणे, प्रजाहिताची कार्ये राजासाठीआदर्श निर्माण करतात तसेच अयोग्य निर्णयांचे परिणामही दाखवितात. इतिहासाच्या अध्ययनातून सुजाण राजा पुष्कळ शिकू शकतो.

**वार्त्ता –** वार्त्ता विद्येत शेती, पशुपालन आणि व्यापार या अर्थप्राप्ती करुन देणाऱ्या ज्ञानाशाखांचा समावेश आहे. या विद्येच्या अध्ययनामुळे राजाला धान्य, पशु, धन, जंगलातील उत्पन्न योग्य मार्गाने कसे प्राप्त करावे याचे ज्ञान होते. धनप्राप्तीचे हे मूलभूत स्त्रोत आहेत. या स्त्रोतांमुळेच राजकोश पूर्ण होण्यास सहाय्य होते. राजकोश समृद्ध असेल तर प्रजेचा विकास साधता येतो. दण्ड म्हणजे सैन्य सक्षम करता येते स्वराज्य सुरक्षित व समृद्ध होतेच पण शत्रूलाही ताब्यात ठेवता येते. त्यामुळे वार्त्ताविद्येचे ज्ञान राजासाठी अपरिहार्य आहे.

**दण्डनीति –** दण्ड शब्दाचे दोन अर्थ आहेत. दण्ड म्हणजे सैन्य, दण्ड म्हणजे 'कायदा'. कायद्याचा यथायोग्य उपयोग करण्याची पद्धती म्हणजे दण्डनीती. राज्यात दण्डाची म्हणजे कायद्याची योग्य अंमलबजावणी केली तर सुव्यवस्था, शांतता निर्माण होते. या आदर्श राज्यव्यवस्थेत अप्राप्त गोष्टींची प्राप्ती होते, जे प्राप्त केले आहे त्याचे रक्षण होते, जे रक्षण केले आहे त्याची वृद्धी होते.

कायदा अति मृदू अथवा अतिकठोरही नसावा. यथायोग्य दण्डाने बलवानांना ताब्यात ठेवता येते आणि दुर्बलांचे रक्षण होते. अशारितीने प्रजेवर योग्य नियंत्रण ठेवण्यासाठी दण्डाची अंमलबजावणी कशी करायची हे दण्डनीति ही विद्या राजाला शिकवते.

या चारही विद्या राजाने शिकायलाच हव्यात असा कौटिल्याचा आग्रह दिसतो. या चारही विद्यांचा एकत्रित विचार करता असे दिसते की त्या परस्परपूरक आणि परस्परावलंबी आहेत. यापैकी एकच विद्या शिकून राजाला आदर्श आणि परिपूर्ण राज्य निर्माण करता येणार नाही जसे. राज्य योग्यपद्धतीने चालवायचे तर दण्डनीतीचे ज्ञान हवे. राज्य सुरक्षित ठेवण्यासाठी आणि राज्याच्या विकासासाठी धन हवे. वार्त्ताविद्येचे ज्ञान असेल तर धनप्राप्ती होऊ शकते. धनप्राप्तीला नैतिकतेचे अधिष्ठान हवे त्यासाठी 'स्वधर्म' सांगणाऱ्या त्रयीविद्येचे अध्ययन आवश्यक आहे. नैतिक-अनैतिक, वैध-अवैध, योग्यायोग्य हा निर्णय, तसेच प्राप्त ज्ञानांचे आकलन, संश्लेषण, विश्लेषण आन्वीक्षिकी विद्येच्या ज्ञानानेच होऊ शकते. एवं चारही विद्यांचे ज्ञान अवश्यंभावी आहे.

राजाने शिकायच्या या विद्या केवळ चारच आहेत असे वाटले तरी त्यांमध्ये अनेक उपविषय समाविष्ट आहेत. या उपविषयांचा विचार करता या विद्यांची व्याप्ती प्रचंड आहे हे लक्षात येते. या विद्याविषयांचे इतर विद्वानांचे अनेक ग्रंथ कौटिल्याच्या काळी अस्तित्वात असावेत. त्यांचे साद्यंत अध्ययन अपेक्षित होते. याशिवाय क्षत्रिय म्हणून राजाने धनुर्वेद, शस्त्रविद्या, सारथ्य, गजशास्त्र, अश्वशास्त्र इ. विद्या शिकणे अपेक्षित होते.

कौटिल्याचे राजाच्या शिक्षणाविषयीचे हे विचार राजासाठी अपेक्षित अशी शैक्षणिक पात्रता अधोरेखित करतात. राजाचे ज्ञान चुतरस्त्र असावे, राजाचे व्यक्तिमत्त्व अष्टावधानी असावे याची जाणीव ३००० वर्षांपूर्वी कौटिल्याला होती. नव्हे, ती अत्यावश्यक वाटत होती. आज मात्र राज्यकर्ते आणि मंत्री यांच्या शैक्षणिक पात्रतेविषयी कोणतेही निकष स्पष्ट नाहीत. वैचारिक दृष्ट्या आजही आपल पूर्वजांच्या पुष्कळच मागे आहोत! नाही का?

**डॉ. सौ. वैशाली जयंत दाबके**
३०२, मित्तल पार्क टॉवर २, रघुनाथ नगर,
तीन हात नाका,
ठाणे - ४०० ६०४

●●●

**दैव म्हणजे**

आम्हीं देवही मानीत नाहीं. दैवही मानीत नाहीं असें म्हणणारे लोक खोटें बोलत असतात किंवा आत्मवंचना (आपली फसवणूक) करीत असतात. लॉटरी, ब्रिज, रमी, रेस, क्रिकेट इत्यादि बाबतींत अपयश आलें की, आपलें 'बॅडलक' यशस्वी होणाऱ्याचें गुड्लक असें चटकन् म्हणतात. 'लक्' म्हणजे काय? दैवच ना?

म्हणून यशापयश मोकळेपणानें - आनंदानें स्वीकारणें एवढेंच आपले हातीं असतें हें लक्षांत ठेवावें.

(सद्धर्म त्रैमासिक जुलै १९९२ च्या अंकातून संक्षिप्त)

(मुख पृष्ठावरून) **संपादकीय**

ज्ञानेश्वर माऊलींनी ‘वारी’ ची महती अधिक प्रमाणात वाढवली असे म्हणता येईल. मात्र पंढरपूर हे देवस्थान म्हणून खूप प्राचीन काळापासून प्रतिष्ठित होते असे पद्मपुराण व स्कंद पुराणातील उल्लेखावरुन दिसते. तेव्हापासून लोक पंढरपूरला दर्शनासाठी येत होते. दर्शनास आलेल्या सर्वांची पापे नष्ट कर असा वर भक्त पुंडलिकाने मागितला असा उल्लेख पद्मपुराणात आहे.

एकदा श्रीकृष्णावर रुसून रुक्मिणी दिंडीरवनात गेली. कृष्ण तिला शोधताना पुंडलिक जिथे आईवडिलांची सेवा करत होता तिथे आले व पुंडलिकाने दिलेल्या विटेवर ‘युगे अठ्ठावीस’ उभे राहिले.

**‘इति स्तुत्वा ततो देवं प्राह गद्गदया गिरा।**
**अनेनेव स्वरुपेण त्वया स्थेयं ममांतिके।।**
**ज्ञानविज्ञानहीनानां मूढानां पापिनामपि**
**दर्शनान्ते भवेन्मोक्षः प्रार्थयामि पुनः पुनः’**
(स्कंदपुराण - ५८-५९)

अर्थात कृष्णाने विटेवर विठ्ठलाच्या रुपात उभे राहून सर्व भक्तांचा उद्धार करावा हा वर पुंडलिकाने देवाला मागितला व तेव्हापासून ही ‘वारी’ चालू झाली. वारकरी पंथातील काही सांप्रदायिक भक्तांची अशीही एक धारणा आहे की पहिली वारी महादेवांनी केली. इसवी सनाच्या आठव्या शतकात आदिशंकराचार्यांनी ‘पांडुरंगाष्टक’ नावाचे एक प्रासादिक स्तोत्र लिहिलं आहे.

**‘महायोगपीठे तटे भीमरथ्यां**
**वरं पुंडरिकाय दातुं मुनिन्द्रै**
**समागत्य तिष्ठं तमानंद कंदं**
**परब्रह्म लिंगं भजे पांडुरंगम्।।**

याचा अर्थ असा कि, संत ज्ञानेश्वरांच्या आधी पंढरपूर हे देवस्थान प्रसिद्ध होते. ज्ञानेश्वरांचे आजोबा सिधोपंत देखील पंढरीचे वारकरी होते. पुढे ज्ञानेश्वरांनी या वारीला एक विशाल स्वरुप प्राप्त करून दिले. सर्व जाती पंथाच्या लोकांना भक्तिमार्ग कळावा म्हणून ‘विठ्ठल’ नामाचा गजर करत पंढरपूरला पायी जाण्याचा वारीरुपी प्रवाह ज्ञानदेवांनी वृद्धिंगत केला. ज्ञानेश्वरांनी वारीला जाणाऱ्या वारकऱ्यांचे सुंदर वर्णन केले आहे.

**टाळघोळ चिपाळी या नाद। दिंडी पताका मकरंद।**
**नाना बागडियांचे छंद। कवच अभेद नामाचे।**
**वैष्णव चालिले गर्जत। महावीर ते अद्भुत।**
**पुढे यमदूत पळत। पुरला अंत महादोषा।**
**निवृत्ती संत हा सोपान। महावैष्णव कठीण।**
**मुक्ताबाई तेथे आपण। नारायण जपतसे।**
**ज्ञानदेव वैष्णव मोठा। विठ्ठल नामे मुक्तपेठा।**
**स्नानदान घडे श्रेष्ठा। वैकुंठ वाटा संत गेले।।**

ज्ञानेश्वरांनी वारीचे केलेले वर्णन हे त्याकाळातील वारीला येणाऱ्या वैष्णवांच्या चैतन्यमयी सळाळत्या प्रवाहाचे वर्णन आहे. ज्ञानेश्वर स्वतः एक सिद्ध पुरुष असून त्यांनी केवळ समाजामध्ये भक्तीचा प्रवाह खळाळत रहावा व नामस्मरणाचे सोपे तंत्र जनतेच्या मनी रुजावे म्हणून वारीची परंपरा पुनरज्जीवीत

केली. ज्ञानप्राप्ती झाल्यावर सामान्य जनांप्रती असलेली कणव या साधु पुरुषाच्या आचरणाने स्पष्ट होते. त्यांच्या या विश्वात्मक जाणिवेमुळे त्यांना 'माऊली' हे बिरुद सार्थ वाटते. ते म्हणतात –

**अवघाची संसार सुखाचा करीन।**
**आनंदे भरीन तिही लोक।**
**जाईन गे माये तया पंढरपुरा**
**भेटेन माहेरा आपुलिया।।**

हे जग आनंदाने भरुन टाकून माझ्या माहेरी म्हणजे पंढरपुरी जाईन असं माऊली म्हणतात. त्यांच्या दृष्टीने वारी हे एक आनंदाने ओसंडून वाहणारं स्नेहसम्मेलनच होय. केवळ पायी चालत टाळ कुटत जाणारे लोक वारकरी नसून पदोपदी ज्यांना देवाची प्रचीती व प्रतीती होते ती वारी. वारीमुळे अहंकार विसरुन एकमेकांच्या पायी लोटांगण घालणारे वैष्णव दिसतात. अध्यात्ममार्गावरील अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणजे श्रद्धा व भक्ती. श्रद्धा दृढ होण्यासाठी वारीचे प्रयोजन आहे. श्रीशिवलीलामृत ग्रंथात श्रीधरस्वामी म्हणतात –

**'ज्यासी न घडे सत्समागम**
**त्याने करू जावे तिर्थाटन।।'**

अर्थात रोजच्या रहाटगाडग्यात ज्याला सत्समागम होत नाही त्याने तीर्थाटन करावे. तीर्थाटन करताना आपोआपच संत दर्शन होते. पंढरपुरच्या वारीत या दोनही गोष्टी होतात. सर्व जातीभेद विसरुन 'वासुदेवः सर्वम्' या प्रतितीचा बोध घेत जनसामान्यही भक्तीचा रस चाखू शकतात.

ज्ञानेश्वरांनी म्हटलं कि परमेश्वर जर कुठे असेल तर तो जिथे हरिदास भगवंताचे चिंतन, कीर्तन करतात तिथे असेल.

ज्ञानेश्वर म्हणतात –

**'तो मी वैकुंठी नसे। भानुबिंबीही नसे।**
**योगियांच्या मानसे। उमरडोनी जाय।**
**परी तयापाशी पांडवा। मी हरपला गवसावा**
**जेथ नामघोष बरवा। करिती माझा।।'**

(ज्ञानेश्वरी अ.९)

केवळ पायी चालणं म्हणजे वारी नसून पदोपदी भगवंताचं कीर्तन करणं म्हणजे वारी. भगवंताच्या नामस्मरणाने जगातील सर्व दुःखाचा विसर पडतो व अवघे विश्व महासुखाने भरून जाते. माऊली म्हणतात –

**'ऐसे माझेनि नामघोषे। नाहीचि करिती विश्वाची दुःखे।**
**अवघे जगचि महासुखे। दुमदुमित भरले।।**

(ज्ञानेश्वरी अ.९.२०८)

वारकरी परंपरेनुसार ज्ञानेश्वरांनी जेव्हा समाधी घेण्याचा निर्णय पांडुरंगासमोर जाहीर केला तेव्हा सर्व संत ज्ञानेश्वरांसोबत आळंदीला आले. आळंदीची वारी ही संताची वारी तर पंढरीची वारी ही देवाची वारी. पुढे एकनाथ महाराजांनी वारीची परंपरा चालू ठेवली. इस्लामी आक्रमणांच्या धामधुमीत महाराष्टात भक्तीपरंपरा वारीच्या माध्यमातून एकनाथांनी चालू ठेवली. यामुळे कठीण काळातही समाज

धर्मप्रवण व ईश्वरार्पित चित्त राहिला. वारकरी संप्रदायाचे महाराष्ट्रावर या अर्थाने मोठे उपकार आहेत. एकनाथांनी ग्रंथातील वेदांत भारुडाच्या रुपाने अधिक लोकांपर्यंत पोचवला. भागवताच्या एकादश स्कंदावर त्यांनी लिहिलेली प्राकृत टीका 'एकनाथी भागवत' नावाने प्रसिद्ध आहे. यात त्यांनी भक्तीचे विशुद्ध स्वरुप वर्णिले. श्लोकांना लोकांपर्यत पोचवण्याचे हे महत्कार्य नाथांनी केले. म्हणूनच त्यांना वारकरी पंथाचा 'खांब' म्हणतात. 'नाचू कीर्तनाचे रंगी। ज्ञानदीप लावू जगी' ही वारकरी परंपरेची नामदेवांनी दिलेली हाक एकनाथांनी खऱ्या अर्थानी जागृत ठेवली. एकनाथ म्हणतात –

**'साधन ते सार पंढरीची वारी।**
**आन न तू करी सायासास।**
**वेद तो घोकिता चढे अभिमान।**
**नाडेल तेणे जाण साधन ते।**
**शास्त्रमतवाद कासया पसार।**
**करी सारासार वारी एक।**
**ग्रंथ पहावे तरी आयुष्य क्षणिक।**
**व्यर्थ खटपट करुनी काई।**
**एका जनार्दनी साराचे पैसार।**
**विठ्ठल त्रिअक्षरी जप करी।।**

भजन, नामस्मरण, कीर्तन यांच्या माध्यमातून परमेश्वराला प्राप्त करणे हा वारकरी पंथाचा सरळसोपा मार्ग आहे. भागवत संप्रदायात याला नवविधा भक्ती म्हणतात –

**श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणं पादसेवनं।**
**अर्चनं वंदनं दास्यं सख्यं आत्मनिवेदनम्।।**

श्रवण, कीर्तन, स्मरण, पादसेवन, अर्चन, वंदन, दास्य, सख्य व आत्मनिवेदन या नऊ भक्ती एक 'वारी' केल्याने सिद्ध होतात व 'याची देही याची डोळा' माणसाचे जीवन कृतार्थ होते. हा वारीचा मूळ गाभा आहे. हा संप्रदाय जड व चेतनात फरक करत नाही तर स्पृश्य व अस्पृश्य हा भेद येतोच कुठे. एकनाथांनी तर म्हटलं हरीच्या दासाला हरी सर्व दिशांमध्ये व्यापून भरलेला दिसतो. एकदा चित्तात समतेचा भाव आला की अवघे त्रैलोक्य आनंदाने भरुन जाते.

नाथांची परंपरा पुढे तुकाराम महाराजांनी चालू ठेवली. पंढरीच्या वारीबद्दल तुकोबांनी अनेक अभंग लिहिले. त्यांनी पांडुरंगाकडे एकच इच्छा व्यक्त केली आहे व ती म्हणजे 'माझी वारी कधी चुकू देऊ नको'

वारकरी संप्रदायात तुकोबांचा हा अभंग नित्यपाठात आहे–

**'हेचि व्हावी माझी आस।**
**जन्मोजन्मी तुझा दास।**
**पंढरीचा वारकरी। वारी चुको नेदी हरी।**
**संतसंग सर्वकाळ। अखंड प्रेमाचा कल्लोळ।**
**चंद्रभागे स्नान। तुका मागे हेचि दान।।'**

ज्या प्रमाणे ज्ञानदेवाचे 'पसायदान' प्रसिद्ध आहे तसे तुकोबांनी मागितलेलं हे एक दान आहे. 'वारी' हा या दानाचा एक महत्त्वाचा भाग आहे.

ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ व तुकाराम या प्रमुख संतांनी वारीची परंपरा अधिकाधिक वृद्धिंगत करवली. ज्ञानदेवांचे समकालीन अनेक जाती पंथाचे संत सामाजिक समरसतेच्या भावनेतून एकत्र आले. हा वसा अगदी आजपर्यंतच्या पालखी व दिंडी सोहळ्यात पहावयास मिळतो.

या प्रमुख संतांच्या निर्याणानंतर त्यांच्या नावाने पालख्या व दिंड्या नेण्याचा प्रघात हैबतबाब अरफळकर यांनी सुरू केला. हैबतबाबा हे ग्वाल्हेरच्या शिंद्यांच्या दरबारी सरदार होते. त्यांनी सर्वप्रथम ज्ञानेश्वरांच्या पादुका गळ्यात बांधून पायी दिंडी काढली. ते लष्करी शिस्तीचे असल्यामुळे व त्यांचे तत्कालिन राजेरजवाडे व सरदारांशी जिव्हाळ्याचे संबंध असल्याने त्यांनी ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीला एक भव्य दिव्य स्वरुप मिळवून दिले. हत्ती, घोडे, पालखी इत्यादी व्यवस्था त्यांनी माऊलींच्या पालखीला करवली. महाराष्ट्रातील प्रमुख संतांच्या पालख्या आजही मोठ्या दिमाखात व शिस्तीत आषाढी एकादशीला पंढरपूरात पोहचतात. नियोजनाचे व प्रशासनिक शिस्तीचे धडे वारीच्या एकूणच व्यवस्थेतून आजच्या पिढीला घेता येतील. सद्य प्रचलित असलेल्या दिंड्या व पालख्या आणि त्यांची व्यवस्था हा एका स्वतंत्र लेखाचा विषय होईल.

पंढरीची वारी म्हणजे भक्तीचा एक चैतन्यमयी प्रवाह आहे. गेली हजारो वर्षे ही वारी चालू आहे व पुढे 'यावच्चंद्रदिवाकरौ' ही संतांची पावन परंपरा चालतंच राहील असा विश्वास ज्ञानदेवांनी मांडला आहे –

**'पाठी महर्षि येणे आले। साधकाचे सिद्ध झाले। आत्मविद् थोरावले। येणेचि पंथे।'**

अर्थात याच वारीच्या मार्गावर अनेक महर्षी चालले. साधकांचे सिद्ध झाले व आत्मविद् संत अधिकाराने थोर झाले. संतांनी केवळ या मार्गावरचे काटे दूर करून 'उजळावया आलो वाटा' असं म्हणत भक्तीचा मार्ग वारीच्या रुपाने उजळून टाकला आहे. वारी म्हणजे जीवाचं परमात्म्याशी मिलन आहे व पायी चालणं, टाळमृदंग वाजवणं, कीर्तन व नामस्मरण ही साधनं आहेत. हे विश्व आनंदाने दुमदुमून जावो ही वारीच्या मागची आध्यात्मिक पृष्ठभूमी आहे. म्हणूनंच संतांनी म्हटलं –

**'होय होय वारकरी। पाहे पाहे रे पंढरी।।'**

•••

**संपादक** : डॉ. विजय वासुदेव बेडेकर
**प्रकाशक व मुद्रक** : अनंत विनायक धोरे, लक्ष्मी केशव कार्यालय, प्रताप सिनेमासमोर, कोलबाड, ठाणे - ४०० ६०१
**मुद्रणस्थळ** : परफेक्ट प्रिन्टस्, नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१